# माणूस

१५ डिसेंबर १९७३
पन्नास पैसे

## नागपूर केंद्र

## दारव्हेकरांचे हस्तलिखित

## एका परीक्षकाची उचलबांगडी

?



सांगायलाच्
हवं का ?
SATHE
MALTex
BISCUITS
ताजी, कुरकुरीत व
रुचीला आगळीच -
वा ! ही तर
साठे माल्टएक्स
बिस्किटेच !
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेच या बिस्किटात आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली
माल्टएक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच !
साठे
बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा !
heros'-SBC-49C MAR

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१५ डिसेंबर १९७३

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : एकूणतिसावा

---

## उपेक्षिलेली गंभीर समस्या

वरसोवा इथे बाजरी-मासळी जेवणातून विषबाधा होऊन एक मुलगी दगावली.......[ मुंबई वृत्तपत्रातील एक बातमी ]

आणि मग एकापाठोपाठ बातम्या येतच गेल्या.

जोगेश्वरी, बोरिवली, आग्रीपाडा, खार....

...पुणे ससूनमध्ये खास उपचार पथक....

अनाथाश्रमात चाळीसांना विषबाधा....

....जितूर येथे दोन मृत्यु...

## भेसळ....विषबाधा....भेसळ....

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# ....भेसळ, विषबाधा

सु. ल. सोमण

ठाण्यातले एक अद्यावत, नवीनच सुरू झालेले हॉटेल. माझ्या एक मित्रासमवेत ह्या हॉटेलात मी शिरलो. कुठल्यातरी थंड पेयाची मी ऑर्डर देणार होतो, पण मित्राने खुणावले. नंतर त्यानेच कॉफी मागवली. वेटर निघून गेल्यावर, मित्र मला म्हणाला.

'शहाणा असशील तर ह्या हॉटेलात आल्यावर कधीही थंड पेये मागवू नकोस. इथे उपलब्ध असणारे गोल्ड स्पॉट, कोकाकोला जवळ जवळ सर्वच माल उल्हासनगरचा तयार झालेला असतो. खरा कधीच नसतो...'

आलेली कॉफी तोंडाला लावीत मित्र पुढे म्हणाला, 'इतर ठिकाणीही अशीच परिस्थिती नसेल असे सांगता येत नाही. पण इथली परिस्थिती मला निश्चित माहीत आहे. आणि माहित असताना विषाचा प्याला कोण लावील तोंडाला?

मित्राने आणखीही बरीच माहिती पुरवली, '...उल्हासनगर, धारावी, मानखुर्द वगैरे ठिकाणी अशी नकली पेये बनवली जातात. बाटल्या, त्यांच्यावरचे सीलिंग लेबलिंग वगैरे इतके तंतोतंत असते की हा माल बनावट असेल अशी शंकाही कुणी घेऊ शकणार नाही...' असे एकदोन कारखानेही मला दाखवायचे त्याने मान्य केले...

दोन तीन दिवसातच, नंतर आम्ही धारावीतल्या एका छोट्या गाळ्यात शिरलो. जेमतेम १० फूट × १० फूट चा एका अगदी आडबाजूच्या झोपडपट्टीतला तो गाळा होता. तिथे पोचायलाही धड वाट नव्हती. चारी बाजूला खुल्लंखुल्ला सर्व नैसर्गिक विधी उरकले जात होते आणि तशा अवस्थेतही, चाळीजवळून पंधरावीस फुटावरून जाणाऱ्या रस्त्यावरून टेंपोची रहदारी सुरू होती. मध्येच एखादा ट्रकही धावत होता. ज्या गाळ्यात आम्ही उभे होतो त्याच्या आजूबाजूच्या दोन-तीन छोट्या गाळ्यातून बिस्किटे, गोळ्या वगैरे पदार्थ बनत होते. एका ठिकाणी, अगदी लागूनच, चामडे उघड्यावर वाळवले जात होते, त्याच्या बारक्या वस्तू बनत होत्या. आणि प्रत्यक्ष आम्ही उभे होतो, त्या गाळ्यात होते सॅकरीन! साखरेच्या

पृष्ठ ४२ वर

# एका विजयाची मिरवणूक

निळू दामले

सकाळी लातूरच्या मोटार स्टँडवर उतरलो.

वातावरण बरेच वेगळे होते.

दुपारी दयानंद कॉलेजकडे निघालो होतो. पलीकडच्या पेट्रोल पंपावर ट्रॅक्टर्स आणि ट्रक्सची झुंबड उडाली होती. त्यामधून भरले होते खूप लोक. कपडे गुलालाने माखले होते. कपाळे गुलालाने भरली होती ताशे वाजंत्री वाजत होती. कॉलेजमध्ये तास होणे मुश्कील झाले होते इतका आवाज.

निवडणुका तर होऊन गेल्या होत्या, सणासुदीचेही दिवस नव्हते, मग ही गड-बड कसली ?

कॉलेजवरून पुन: गावात जायला निघालो. वाटेत मोटारसायकली इकडून तिकडे पळताना जाणवत होत्या. दोन तीन स्टेशन वॅगन्समधून माणसे भर-भरून आणली जात होती.

अशोक हॉटेलजवळ एका रिक्षामध्ये लाऊड स्पीकरवरून एक माणूस बोलत होता—

'नाडे-समुद्रे गटाचे आणि आपल्या तालुक्याचे लोकप्रिय आमदार माननीय शिवराज पाटील चाकूरकर यांच्या गटाचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आल्याप्रीत्यर्थ आज दुपारी ३ वाजता भव्य मिरवणूक निघणार आहे. सर्वांनी उपस्थित राहावे. मिरवणुकीनंतर विजयी उमेदवारांचा सत्कार होणार आहे.' आता लक्षात आले.

हल्ली काँग्रेस 'पक्ष' असे कोणी म्हणत नाही. 'गट' अशा भाषेत बोलले जाते.

१०–१५ दिवसापूर्वी एकदा या भागात फेरी मारली होती. त्यावेळी उस्मानाबाद जिल्हा बँकेची निवडणूक रंगत होती. हजारो रुपयांचे पेट्रोल खर्ची पडत होते. आ. केशवराव सोनावणे (ज्यांना बापू काळदातेंनी जबरदस्त आपटी दिली होती) तुळशीराम पाटील (खासदार), संग्राम माकणीकर (आमदार) अशांचा एक गट झाला होता. त्याविरोधात शिवाजीराव नाडे, आ. शिवराज पाटील चाकूरकर, आ. हंगरगेकर अशांचा गट उभा ठाकला होता.

दोन्ही गट काँग्रेसचेच बरं का ! दोघांनाही गरिबांचा फार कळवळा ! ! दोन्ही गटांचे मेळावे चालले होते. खूप शिवीगाळ. एकमेकांचे (पर्यायाने जिल्ह्यातल्या एकूण काँग्रेसच्या पापांचे) पाढे वाचले जात होते.

बँकेत आणि तेरणानगर सहकारी साखर कारखान्यात नाडे चाकूरकर गटाचा विजय झाला होता.

ज्यांची पापे केशवराव सोनवण्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या काळात झाकून टाकली होती असे बरेच लोक आता

चाकूरकरांच्या गटात बसले होते. केशवरावांना आता मंत्रीपद मिळणार नाही याची खात्री वाटल्यावरून जिकडे गूळ गेला तिकडे या माशा पोचल्या होत्या.

लातूर शहरात तर या भांडणाला वेगळाच रंग. केशवराव सोनवणे आणि शिवराज पाटील. चाकूरकर अगदी जवळ जवळच राहतात. दोन्ही आमदारांची थुंकी झेलण्यासाठी आतुरलेल्यांचा होयबा वर्ग लातूरमध्ये आहे.

या दोन्ही पुढाऱ्यांमधून आणि त्यांच्या विविध धातूंच्या आणि विविध आकारांच्या चमच्यांच्या दलांमधून विस्तवही जात नाही.

अशा गटांच्या लढतीतून मिळालेल्या एका विजयाची ही मिरवणूक !

आली. आली. मिरवणूक आली. दुतर्फा लोक हा तमाशा बघायला उभे आहेत.

पुढे दोन जीपमध्ये जिंकलेले लोक उभे आहेत.

हे नाडेसाहेब. मुरूडचे. आता बँकेचे (सहकार बँक बरं का !) चेअरमन होऊ मागतायत. (थोडी कुरबूर आहेच !) मुरूडचा दादा माणूस. स्वाहाकारी संस्थांचे मोठे जाळे. आजच्या मिरवणुकीला अख्खे मुरूड खाली करून आणलेय त्यांनी. ट्रक भरभरून. आता त्यांनीच नाड्यांकडे आदराने पाहून नमस्कार करायचा नाही, जयजयकार करायचा नाही, मग कोणी करायचा ? त्यांनी पाठवलेल्या ट्रकशी, पैशाशी इमानदारी नको दाखवायला ?

शिवराज पाटील नेहमीच्या हीरो टाईप स्टायलीत उभे आहेत. काही दिवसांपूर्वी आपण मंत्री होणार अशी पुडी यांनी आपल्याच आश्रितांच्या करवी सोडून दिली होती. विधानसभेच्या कॉरिडॉरमध्ये आपण मंत्रीच आहोत अशा थाटात त्यांना वावरताना बऱ्याच जणांनी पाहिलंय. आणखी थोडी ओळख हवी आहे ? लातूरच्या गोळीबाराबाबतच्या न्यायालयीन चौकशीचा अहवाल वाचलाच असेल. तीनपैकी दोन गोळीबार न्यायालयाने आता अयोग्य ठरविले आहेत. त्या लातूरलाच एस्. टी. डिव्हिजन मिळवण्यासाठी आंदोलन उचकावणाऱ्यात हेही एक होते. २ मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला या आदोलनात. पोरं रागावून आपल्याला गाढवावर बसवणार हे कळल्यावर दोन माणसांच्या बंदूकीच्या पाहऱ्यात घरी बसले होते. पोलिसांच्या बंदुका पोरांवर वळलेल्या होत्या.

हे एक ब्रिजमोहन अगरवालही.मोठ्या दिमाखात उभे आहेत.

परदेशी पाहुणे किंवा नेहरू वगैरे लोक ज्या प्रकारे अभिनंदनाचा स्वीकार करतात तो दिमाख ! हे नगराध्यक्ष असताना ते पद टिकवताना खूप कोलांट्या उड्या हे मारीत होते. यांच्याच कारकीर्दीत लातूर नगरपालिकेची ऋग्णवाहिका आमदारांच्या लग्नाचे वऱ्हाड आणण्यासाठी जात असताना जयंत वैद्यांनी पकडली होती. अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या अधिवेशनालाही ही ऋग्णवाहिका एकदा

गेली होती. प्रकरण कसेतरी मिटले होते.

बाकीचे लोकही कोण असे; कोण तसे; फरक विशेष नाही. २५ ट्रक्स होते या तीन जीप्सच्या पाठी. ही भली मोठी रांग. त्यांच्यापाठी २०–२५ जीप्स अँबॅसडर गाड्यांचा ताफा, ट्रॅक्टरला जोडूनच आणलेल्या गाड्या, अशी ही मिरवणूक हळू हळू सरकत होती. 'आला रे आला – नाडे आला, पडला रे पडला – सोनवणे पडला' अशा-सारख्या घोषणा.

इंदिरा गांधींनी पेट्रोल वाचवण्या-साठी एक दिवस बग्गीतून प्रवास केला होता. काटकसरीने पेट्रोल वापरण्याचा आदेश त्यांनी आपल्या समाजवादी अनुयायांना दिला आहे. त्याचेच हे पालन. ५० हजारांचे पेट्रोल आता आणि लाखभर रुपयांचे निवडणूक मोहिमेच्या वेळी खर्च झाले म्हणून काय झाले? गरिबी हटवायचे काम काय सोपे आहे काय? १० लाखा-ऐवजी १–१॥ लाखच खर्च केले ही काटकसर नाही काय?

केशवराव सोनवण्यांच्या घरासमोर मिरवणूक थांबत होती. घोषणा होत होत्या. घरासमोर पोलीस पहारा होता. घराला कुलूप होते. केशवराव घरी नाहीत! नाडे गटाचे काही लोक विनती करकरून आपल्या लोकांना इथे थांबू नका म्हणून सांगत होते.

केशवराव सोनावण्यांवर इतके अलोट प्रेम! ते घरी नाहीत हे पाहिल्यावर मिरवणुकीतल्या लोकांना वाईट वाटत होते. नाचून नाचून खूप दमलेली ही मिरवणूक संध्याकाळी सातच्या सुमारात टाऊन हॉलमध्ये विसावली. 'श्रमपरि-हाराची व्यवस्था' चांगलीच झाली होती हे लोकांच्या चालण्या-बोलण्या-वरून चांगलेच जाणवले.

ऑडीटरने या उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँकेच्या कारभारातल्या अनेक गैरकारभारावर प्रकाश टाकला आहे. खूप गफले झाले आहेत या बँकेत! (पुन: कधीतरी त्या अहवालाचे अध्ययन आपण सविस्तर करूच!)

अशी ही सहकारी बँकेची आणि सहकारी साखरेची निवडणूक खूप मजेत झाली एकंदरीत.

कुठून येतो येव्हढा पैसा? कशासाठी येव्हढा हा खर्च?

लातूरला आलो होतो. नांदेडहून. कालच नांदेडला होतो.

उस्मानशाही मिलमधल्या काम-गारांची दैना अजून संपलेली नाही. १ लाख ३० हजार लोक संख्येच्या या शहरात किमान २५ हजार लोकांचे जीवन उस्मानशाही मिलवर अवलंबून आहे. त्यांना पगारवाढ मिळत नाही. बोनस द्यायला मॅनेजमेंट तयार नाही. मिल ताब्यात आहे सरकारच्या, पण मॅनेजिंग डायरेक्टर मात्र एक बडा शेट आहे. इंटकच्या कामगारांना हाताशी धरून कामगारांच्या अन्नात धोत्रा मिसळायचे धंदे चालताहेत. उस्मानशाहीचा काम-गार वाढत्या महागाई खाली चिरडून जाऊ नये यासाठी धडपड करतोय, आक्रोश करतोय.

मिरवणुकीच्या जल्लोषात मला उस्मानशाहीच्या कामगारांचा आक्रोश ऐकू येतो आहे, त्याचा चिंताग्रस्त चेहरा दिसतोय.

● ● ●

## मुक्ताफळे

### गरिबांची पार्टी

कुठलीही 'पार्टी' म्हटली की ती श्रीमंतांचीच असते. मग ती 'राजकीय' पार्टी असो की 'पक्वान्नांची' पार्टी असो. गरीब माणूस, मध्यमवर्गीय माणूस याला अशा कुठल्याच पार्टीत जाणे परवडत नाही. राजकीय पार्टीला त्याची गरज नसते आणि मेजवानीला त्याला निमंत्रण नसते. देतो. आपणही पार्टी देतो. पक्वान्न करून नातेवाईकांना परिचितांना, जेवायला बोलावतो. घरी लग्न असले तर. मुंज असली तर! पण तो ऋण काढून केलेला सण असतो. माणसे जेऊन गेल्यानंतर आपण 'हप्ते-बंद' होतो. दुसऱ्या मुलीला दाखवायला सुरूवात होते तरी पहिलीच्या लग्नासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते पुरे झालेले नसतात. पोटच्या पोरांचे काही बरे करावे, या मायेतून आणि संस्कारांच्या काचातून गरिबांच्या या पार्ट्या जन्माला येतात.

श्रीमंतांचे तसे नसते. त्यांना पार्टी द्यायला कारण लागत नाही. एका 'अजब वर्तुळाचा' तो न्याय असतो. या वर्तुळाला नेमकी सुरुवात नसते, शेवटही नसतो. उद्योगपतींच्या एका पार्टीतून दुसरी पार्टी जन्म घेते. दुसरीतून तिसरी, तिसरीतून चवथी. सत्ता पिऊन झिंगलेली माणसे या मेजवान्यांना हजर असतात. इथले खाणे-पिणे निराळे असते. पक्वान्नाबरोबर इथे पैशाचे व्यवहार ठरतात. पार्टी संपते तेव्हा पार्टी देणारा हा अधिक श्रीमंत झालेला असतो! एखाद्या लायसन्सचे पक्के होते. एखादा गैरव्यवहार कायमचा पडद्याआड होतो. मंत्र्यांचा मुलगा यातूनच एखाद्या व्यापारी कंपनीचा भागीदार होतो. डायरेक्टर होतो. त्याच्या बेकार आणि मूर्ख गोतावळ्याला भत्त्या पगाराच्या नोकऱ्या मिळतात.

उत्तर प्रदेशचे नवे मुख्यमंत्री श्री. हेमवतीनंदन बहुगुणा यांनी मंत्रि-मंडळाच्या पहिल्याच बैठकीत सहकारी मंत्र्यांना बजावले—

'श्रीमंतांनी, व्यापाऱ्यांनी आणि उद्योगपतींनी दिलेल्या मेजवान्यांना आणि पार्ट्यांना कुणीही मंत्री जाता कामा नये...'

मंत्रिमंडळ चकित झाले! एक म्हणाला—

'म्हणजे कमलापती त्रिपाठी मंत्रि-मंडळातील मंत्री अशा पार्ट्या झोडायला पूर्वी जात असत असा याचा अर्थ झाला.

श्री. बहुगुणा म्हणाले–

झाले गेले ते यमुनेला मिळाले! कमलापती त्रिपाठी यांच्या अनुभवाची सगळ्या देशाला गरज होती म्हणून त्यांना केंद्र मंत्री केले असे इंदिराजी म्हणाल्या ते वाचले नाही तुम्ही? गंगाकाठचा अनुभव यमुनाकाठी गेला आहे. याद राखा

'तुमच्यापैकी कुणी अशा पाटर्यांना गेला तर!'

मंत्रिमंडळाने विचार केला, तरुण रक्त आहे. व्यापाऱ्यांकडे खायला प्यायला जाऊ नका असे मुख्यमंत्री सांगत आहेत. नाही गेला त्यांच्याकडे आपण. आपण त्यांना बोलावू नये असे तर त्यांनी म्हटलेले नाही! प्रेमात पडलेली माणसे भेटायची रहात नाहीत. यापुढे आपणच त्यांना पार्टीला बोलावू म्हणजे झाले!

एक महिनाभर मुख्यमंत्र्यांनी सर्वांवर कडक नजर ठेवली. त्यांच्या असे लक्षात आले की आपले मंत्री श्रीमंताकडे, व्यापाऱ्याकडे, उद्योगपतीकडे खायला प्यायला जात नाहीतच. उलट आठवणीने गरिबांकडे मुद्दाम जेवायला जातात!

गेल्या आठवड्यातली गोष्ट रविवारी सर्व मंत्री गरीबगुरिबांकडे रात्री जेवायला गेले होते. सोमवारी सकाळी मंत्रिमंडळाची बैठक होती. मुख्यमंत्री सचिवालयात सर्वांची वाट पहात होते. तास गेला दोन तास गेले. एकही मंत्री हजर होईना. त्यांनी चिटणीसांना विचारले,

'सर्व मंडळी गेली आहेत कुठे?'

'सर्वजण सरकारी हॉस्पिटलात आहेत. थोड्यावेळापूर्वी डीनचा फोन आला होता की मंत्रिमंडळाची बैठक हॉस्पिटलात घेतली तर सोईचे होईल. कारण सगळ्यांना उलट्या आणि जुलाब होत आहेत...'


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

**ब. मो. पुरंदरे**

**किमत : सात रुपये**

**राजहंस प्रकाशन**

'सगळयांनाच कशा उलटया व्हायला लागल्या बुवा ?'

चिटणीसांनी खुलासा केला–

'काल सगळे शहराच्या निरनिराळया भागात गरिबांकडे जेवायला गेले होते. सगळयांनी बाजरीच्या भाकऱ्या खाल्या. गरिबांचे ते राष्ट्रीय अन्न आहे !

'आरोग्याधिकारी काय म्हणाले ?'

'त्यांचे म्हणणे घावरून जाण्याइतका हा गंभीर प्रकार नसतो ! ओकाऱ्या काढून पोटात गेलेले अन्न बाहेर काढले की झाले...!'

श्री. बहुगुणा विचारात पडले आहेत. गरिबांकडेही कुणी जेवायला जाऊ नका असा आदेश मंत्र्यांना दिला तर ते बरे दिसणार नाही. त्यापेक्षा असे म्हटले तर 'जेवायला कुणाकडेच जाऊ नका. जायचेच झाले तर गरिबांकडे मुळीच जाऊ नका. जेवायला जाऊन गरिबांची गरिबी वाढवणे हे समाजवादी मंत्र्यांना शोभणारे नाही !'

ही बाजरी आली कुठून अशी चौकशी केल्यावर ही बाजरी महाराष्ट्रातून आल्याचे श्री. बहुगुणा यांना कळले. त्यांनी ताबडतोब ना. नाईक यांना फोन केला

'महाराष्ट्रात परिस्थिती काय आहे ?'

ना. नाईकांनी सांगितले–

'इथे मंत्रिमंडळाची परिस्थिती उत्तम आहे. गरिबांनी आधी खाल्ल्याशिवाय आम्ही स्वत: इथे काही खात नाही. हिंगण्याच्या आश्रमातील शंभरदोनशे मुलींना उलटया झाल्या वगैरे किरकोळ बातम्या आहेत. बहुगुणाजी माझा तुम्हाला सल्ला आहे. गेली दहा वर्षे मी मुख्यमंत्री आहे. नुकतेच माझ्या सत्तेचे दशक झाले. 'गरिबी हटाव' 'भ्रष्टाचार हटाव' या सगळया घोषणा आहेत हे विसरू नका. कोणत्याही गोष्टीचे स्तोम माजवू नका. तुम्ही अजून या खेळात बच्चे आहात. म्हणून सांगतो. इतर मंत्र्यांना सुधारण्याच्या भानगडीत मुळीच पडू नका. ते जितके मूर्खासारखे वागतील, बडबड करतील ततसे तुमचे आसन स्थिर होईल. फोनवर जास्त सांगत नाही. बाजरीतल्या रोगपेशी काळपट व कठीण असतात. यावर उपाय म्हणजे मिठाच्या पाण्याने त्या वेगळया करणे. दोन किलो मीठ दहा लिटर पाण्यात मिसळावे म्हणजे रोगपेशी वर तरंगू लागते. ती फेकून बाजरी स्वच्छ धुवून वाळवावी. मी शेतकऱ्यातला राजकारणी आणि राजकारणातला शेतकरी आहे. माझा आदर्श ठेवा...!'

श्री. हेमवतीनंदन बहुगुणा हे सध्या बाजरी धुवून घ्यावी की काढलेला आदेश मागे घ्याबा यावर विचार करीत आहेत !

–ग्यानबा

# लातूर गोळीबार

## काही व्यथा - काही प्रश्न

### भू-धर भारती

२७ नोव्हेंबर, १९७३ रोजी महाराष्ट्र शासनाने 'लातूर गोळीबार चौकशी' आयोगाचा अहवाल विधानसभेपुढे सादर केला. नगरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. जी. व्ही. देव यांच्या एकसदस्यीय आयोगाने, झालेल्या ५ गोळीबारांपैकी फक्त एक समर्थनीय आणि बाकी चार असमर्थनीय ठरविले. या चारपैकी तीन बाबतचा निष्कर्ष शासनाने मान्य केला असून एका बाबतचा अहवाल अमान्य केला आहे. ह्याबाबत दोषी असलेल्यांची खात्यामार्फत चौकशी करण्याचा निर्णयदेखील घेण्यात आला आहे.

एस. टी. चे मराठवाड्यातील तिसरे डिव्हिजन कोठे असावे ह्या प्रश्नावर वाद निर्माण होऊन लातूर व उस्मानाबाद येथे आंदोलन झाले. २५ ऑगस्ट, १९७२ रोजी ह्या आंदोलनास लातूर येथे अचानक वेगळेच वळण लागले व गोळीबार झाला. दोन निरपराध जीव प्राणास मुकले, काही गोळ्या लागून जखमी झाले व असंख्य लोकांना पोलीस व एस. आर. पी. च्या दंडुक्यांचा भरपूर प्रसाद मिळाला. २५ व २६ ऑगस्ट रोजी लातूरला एस. आर. पी. च्या दंडुकेशाहीचा नंगा नाच झाला. मराठवाड्यातील शांत व सोशिक जनतेकडून अनपेक्षित असे लातूरला घडले व कदाचित त्यामुळेच न्यायालयीन चौकशीची मागणी काहीही आढेवेढे न घेता शासनाने मान्य केली. परंतु चौकशीची मर्यादा फक्त २५ ऑगस्टच्या गोळीबारापुरतीच मर्यादित ठेवण्यात आली. त्या दोन दिवसात झालेल्या पोलिसी अत्याचार व बळाच्या अतिरेकी वापराची चौकशी करण्याचे शासनाने नाकारले.

सकृद्दर्शनी यात विशेष असे काहीच घडलेले नाही. एखाद्या प्रश्नावर वाद निर्माण होऊन उभयपक्षांनी जोरदार आंदोलन उभे करणे व नंतर थोडी दंगल, जाळपोळ, अश्रूधूर, गोळीबार असे प्रकार आजच्या स्वतंत्र व जागृत भारतात रोज कोठेना कोठेतरी होतच असतात. त्यात नाविन्य ते कसले व ही चर्चा कशासाठी? हे सर्व मान्य करूनही झाल्या प्रकाराची आठवण झाली की मन अजूनही व्यथित होते, सुन्न होते. का घडावे असे? हे टाळता आले असते काय? कोण जबाबदार ह्या साऱ्या (गैर) प्रकाराला? ह्या प्रकरणातील

संबंधित दोषी लोकांना काहीच शिक्षा नाही, हे न्याय-संगत आहे काय ?

किंबहुना ह्या साऱ्या (व नंतरच्या अजून अनेक) प्रश्नांची उत्तरे कोणाजवळही नसावीत – माझ्याजवळ तर नाहीतच. अन् कदाचित कोणाजवळ ती असलीच तर, एकतर तो ती देण्याचे टाळीत असावा किंवा सत्य समोर मांडण्याचे धाष्टर्य त्याच्याजवळ नसावे.

'एस. टी. डिव्हिजनसारख्या क्षुल्लक प्रश्नावर एवढे मोठे आंदोलन उभे करून एवढे रामायण घडवून काय मिळविले ? ह्या प्रश्नास क्षणाचाही विलंब न लावता लातूरच्या एका कार्यकर्त्याने उत्तर दिले– 'आमच्या पिढीस आंदोलनाची तोंडओळखदेखील नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश व निजामी राजवटीचे अत्याचार ऐकून व वाचून माहीत असलेल्या आजच्या तरुण पिढीस 'ह्याची देही, ह्याची डोळा' हे सर्व पहावयास मिळाले. 'छळ व अत्याचारांबाबतच्या आमच्या मनातील परिसीमा पार कोलमडून पडल्या व आमच्या कल्पना अगदीच वेडगळ होत्या हे फार प्रकर्षाने जाणवले. स्वातंत्र्यसंग्रामात होणाऱ्या छळांना न जुमानता आपल्या जीवनाची आहुती देणाऱ्या 'स्वातंत्र्यवीरांबद्दल' आमचा आदर द्विगुणीत झाला.' हे उत्तर मूळ प्रश्नाला बगल देणारे असले तरी अत्यंत मार्मिक आहे हे मान्य करावेच लागेल.

स्वतःचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे किंवा जनमानसातील स्वतःची प्रतिमा कायम राहून आपले नेतृत्व अबाधित रहावे अशा स्वार्थी हेतूपोटी संधिसाधू राजकारण आज प्रत्येक क्षेत्रात खेळले जात आहे. अशावेळी सत्य व न्याय्य बाजू न घेता स्वतःला सोयीस्कर अशी बाजू घेऊन त्याला अनुरूप मुद्दे उभे करणे, मांडणे हा राजकारणी डावपेच काही लोक लीलया करतात व आम्हीच त्यांना 'मुत्सद्दी', 'हुशार', 'धूर्त', 'राजकारणी' असे किताब बहाल करतो. बहुतेक आंदोलनात हेच घडत असल्याचे आज दिसते. ह्या प्रकरणात नेमके हेच घडले आहे.

लातूरच्या नियोजित एस. टी. डिव्हिजनचा वाद नवा नसला तरी त्याची समग्र माहिती फार कमी लोकांना आहे. अनावश्यक वाद उभा करून लोकांची मने पेटविणे व त्यावर आपल्या स्वार्थाच्या पोळ्या भाजून घेण्याचे हे एक अप्रतिम उदाहरण ठरेल. झालेली तथाकथित दंगल, समर्थनीय किंवा असमर्थनीय गोळीबार यांची तात्कालिक कारणे न शोधता ह्या वादाची एकूण पार्श्वभूमी तपासून पहाणे अगत्याचे आहे व तरच घडलेल्या नाटयाचे खरे सूत्रधार (पडद्यामागील) कोण हे कळेल.

औरंगाबाद येथे मराठवाड्यातील एकमेव एस. टी. डिव्हिजन असताना वाढत्या बसेसची संख्या व कामाचा व्याप लक्षात घेऊन मराठवाड्यात दुसरे डिव्हिजन करण्याचे ठरले. कार्यक्षमता, सोय आदींचा प्रामुख्याने निकष लावून लातूरचे ठिकाण जवळपास निश्चित झाले. परंतु राजकारण आडवे आले व लातूरला होऊ घातलेले डिव्हिजन नांदेडला गेले. लातूरकरांकडून कोणताच निषेध झालेला नसतानादेखील

कदाचित अन्याय करणाऱ्यांनाच लाज वाटल्यामुळे, तिसरे डिव्हिजन लवकरच आणि लातूरला होईल असे आश्वासन (कोणीही न मागता) देण्यात आले. कोणत्याही दबावाशिवाय काही दिवसांनी तसा निर्णय झाला व २६–१–७० रोजी राज्य परिवहन मंडळाचे सभासद श्री. जगताप यांच्या हस्ते डिव्हिजनचे कार्यालय लातूरला चालू करण्यात आले. कार्यशाळेच्या जागेची पहाणी होऊन जागा ताब्यात घेण्याची कारवाई चालू झाली.

झालेल्या गोष्टीची उस्मानाबादकर किंवा लातूरकरांपैकी कोणीच विशेष दखल घेतली नाही. असेच काही दिवस गेले व एकाएकी उस्मानाबादची काही नेते मंडळी व पत्रकार जागे झाले. डिव्हिजन लातूरसारख्या तालुक्याच्या ठिकाणी न ठेवता जिल्ह्याच्या ठिकाणीच असले पाहिजे असा दुराग्रह धरून एक खोटे आंदोलन उभे करण्यात आले. जनतेची मने पेटविली गेली. ती पेटली व साधारणपणे आंदोलनात होणारे सर्व प्रकार येथेही झाले.

महाराष्ट्र राज्याचे भित्रे शासन, होत असलेल्या खोट्या आंदोलनास सामोरे न जाता घाबरले व जागा ताब्यात घेण्याच्या कामास तात्पुरता मनाई हुकूम आला. चालू झालेले डिव्हिजनचे कार्यालय चालूच ठेवण्यात आले व ते आजतागायत चालूच आहे. तीन सदस्यांची एक विशेषज्ञ समिती नेमण्यात आली व गुणवत्तेचा सारासार विचार करून डिव्हिजन लातूरलाच होणे जास्त सोयीस्कर असेल तर समिती तसा निर्णय देईलच व तो राबविला जाईल असे आश्वासन लातूरकरांन देण्यात आले. उस्मानाबादकरांच्या दुराग्रहामुळे आणि त्यांच्या समाधानासाठी काही दिवस शांत रहाण्याचे आवाहन लातूरकरांना करण्यात आले.

समितीने उस्मानाबाद व लातूरला भेटी दिल्या व सर्व गोष्टींचा सारासार विचार करून लातूरच्या बाजूने कौल दिला. समितीचा निर्णय जाहीर करण्यात आला नसला तरी शासनाने लातूरला जागा ताब्यात घेण्याच्या कामास दिलेला मनाई हुकूम मागे घेतला.

उस्मानाबादकरांनी पुनश्च आंदोलन सुरू केले, पण ह्यावेळी भूमिका बदलली. जिल्ह्याचे ठिकाण हा निकष तज्ज्ञ समितीने मानला नाही व त्यांचा कौल आपल्याविरुद्ध गेला आहे याची दखल घेऊन त्यांनी आपले पवित्रे बदलले. लातूर श्रीमंत शहर आहे, बरीच प्रगती झालेली आहे व होतही आहे. त्यामानाने उस्मानाबाद अत्यंत मागासलेले आहे व प्रगतीला विशेष वाव नाही या भूमिकेतून शासनाकडे दयेची याचना करण्यात आली. शासनाद्वारे प्रेरित अशा काही योजनांतूनच उस्मानाबादची थोडीफार प्रगती होऊ शकेल व त्यासाठी डिव्हिजन उस्मानाबादलाच चालू करावे अशी भिक्षा मुख्यमंत्र्याकडे मागितली गेली.

उदार मनाच्या आमच्या मुख्यमंत्र्यांना दयेचा पाझर फुटला व पुनश्च एकदा जागा ताब्यात घेण्याचे काम स्थगित करण्यात आले. लातूर व उस्मानाबादची शिष्टमंडळे जवळपास

एकाच वेळी मे १९७२ मध्ये मुख्यमंत्र्यांना भेटली. परंतु दोघांच्याही कल्पनेपेक्षा मुख्यमंत्री जास्त चतुर निघाले. मुख्यमंत्र्यांनी असा काही एक गुगली चेंडू टाकला की, लातूरकर व उस्मानाबादकर दोघेही एकाच चेंडूने बाद झाले.

उस्मानाबाद व लातूर दरम्यान तब्बल ५३ मैलांचे अंतर असूनदेखील डिव्हिजनच्या दोन भागांपैकी—अर्थात कार्यालय व कार्यशाळा—एक एक भाग दोघांना देऊ केला गेला. संबंधित मंत्री व परिवहन मंडळाच्या कार्यवाहांना ही योजना अत्यंत गैरसोयीची वाटत असली तरी मुख्यमंत्र्यांच्या लहरीखातर त्यांना गप्प बसणे भाग होते. 'भागते भूतकी लंगोटी'च्या नियमानुसार उस्मानाबादकरांनी योजना लगेच मान्य केली व मुख्यमंत्र्यांची सहानुभूती मिळविली. लातूरचे शिष्टमंडळ अत्यंत अडचणीत आले. बहुतेक मंडळी काँग्रेस पक्षाचीच असल्यामुळे योजना फेटाळताही येईना व लातूरच्या जनतेच्या भीतीपोटी स्वीकारताही येईना. 'योजना नवी आहे, सहकाऱ्यांशी चर्चा करून कळवू.' असे सांगून व 'सहकाऱ्यांनी योजना मान्य करावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू.' असे आश्वासन देऊन शिष्टमंडळ लातूरला परतले.

लातूरच्या जनतेने शिष्टमंडळाला अनपेक्षित अशी भूमिका घेतली. मुख्यमंत्र्यांची योजना एकमुखाने फेटाळण्यात आली व पुढील कार्यासाठी विविध क्षेत्रातील व विविध तालुक्यातील सुमारे १०० कार्यकर्त्यांची एक कृती समिती नेमण्यात आली. समितीचे अध्वर्यू झाले लातूरचे जुने कार्यकर्ते व 'चाणक्य' श्री. चंद्रशेखर बाजपेयी. मनातून इच्छा नसतानादेखील लातूरचे तरुण आमदार श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांनी 'जनता की आवाज'ला मान दिला व समितीला पूर्ण पाठिंबा व सहकार्य दिले. या घडीला लातूरच्या जनतेवर जास्त प्रभाव असलेले माजी सहकारमंत्री व औसाचे आमदार श्री. केशवराव सोनवणे यांनीदेखील आपला पाठिंबा जाहीर केला. परंतु पाटील-सोनवणे गटातील वाढत्या मतभेदामुळे वेगळेच शिजू लागले. जनतेच्या तीव्र भावना लक्षात घेऊन सोनवणे गटाने ह्या आंदोलनास उघड उघड पाठिंबा दर्शविला असला तरी पाटील गटाने आंदोलन उचलून धरल्यामुळे कसेही करून ह्या आंदोलनास यश येऊ नये यासाठी सोनवणे गट पडद्यामागील हालचाली करीत आहे असे आक्षेप उघडपणे घेतले जाऊ लागले. खुद्द सोनवणे व त्यांच्या पाठीराख्यांनी ते खोटे असल्याचे ठासून सांगितले.

जून, जुलै, ऑगस्टमध्ये आंदोलन चालू राहिले व जवळपास संपूर्ण जिल्ह्यात ४ ऑगस्ट रोजी लातूरच्या मागणीस पाठिंबा दर्शविणारा जिल्हाबंद यशस्वी झाला. दरम्यान दोन्ही शिष्टमंडळांना मुंबईला पाचारण करण्यात आले. दोन दिवस प्रदीर्घ चर्चा होऊनदेखील काहीच फलनिष्पत्ती झाली नाही. योजना स्वीकारल्यामुळे सहानुभूती उस्मानाबादकरांकडे पण गुणवत्ता लातूरकडे ह्या पेचात मुख्यमंत्री सापडले व कोणताच निर्णय घेऊ शकले नाहीत.

आंदोलन चालूच राहिले. 'जे जे होईल, ते ते पहावे' अशी बघ्याची भूमिका घेऊन तमाशा बघण्याचे शासनाने ठरविले. आंदोलन तीव्र करण्याची भाषा उघड उघड बोलली जाऊ लागली. पण 'तीव्र' म्हणजे नक्की काय हे कोणीच सांगू शकत नव्हता. प्रत्येकजण आपल्या परीने त्याचा अर्थ लावू लागला. तरुणांपुढे तीव्र आंदोलनाचा नक्की Mandate असा काहीच नव्हता व 'पुढे काय करावे' ह्या संदर्भात कृती समिती पडली होती. आंदोलनाचा एक भाग म्हणून २३ ऑगस्ट रोजी सर्व प्रतिष्ठित वकिलांनी १४४ कलमाचा भंग केला व स्वत:ला अटक करवून घेतली. 'काय ती शिक्षा करा, पण जामीन नको' अशी भूमिका घेतली गेली. शासनाने आंदोलन करणाऱ्यास जरब बसावी यासाठी १५ दिवसांच्या ज्युडिशियल कस्टडीचा अजब हुकूम कोर्टाकडून घेतला व सर्वांची औरंगाबाद जेलला रवानगी करण्यात आली. ही आंदोलनातील पहिली ठिणगी.

शासनाचा हा पवित्रा नवा होता. आंदोलन चिरडून टाकण्याचा हा पहिला डाव असावा. उत्तरादाखल कृतीसमितीने २५ ऑगस्ट रोजी फार मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह करण्याचे ठरविले. 'पाहू या किती लोकांना शासन अटक करते' असा पवित्रा कृतीसमितीने घेतला. परंतु याचवेळी वकिलवर्गाने जामीन मागावा असा चुकीचा निर्णय घेतला. लातूरच्या तरुणांना कृतीसमितीच्या हेतूबद्दलच शंका येऊ लागली व ते पुरते चिडले. कदाचित ही दुसरी ठिणगी.

२५ ऑगस्ट उजाडला सारे शहर भारावून गेल्यागत होते व आंदोलनाचीच चर्चा करीत होते. ठरल्याप्रमाणे बरोबर ११ वाजता शहराच्या वेगवेगळ्या भागातून सत्याग्रहींच्या तुकड्या तहसीलकडे निघाल्या. सुमारे हजार सत्याग्रहींना अटक करून पोलीस स्टेशनमध्ये उभे करण्यात आले. सत्याग्रही येतच होते व आता काय करावे हा प्रश्न लातूर येथील पोलीस प्रमुखांना पडला.

तापलेल्या वातावरणाचा फायदा घेऊन काही समाजकंटकानी (कदाचित काही अति उत्साही विद्यार्थीही असतील त्यात) दयानंद कॉलेजसमोर एस. टी. ची एक बस अडविली. उतारूंना खाली उतरण्याची विनंती करण्यात आली. आतील व टपावरील सामान खाली उतरवून घेण्यात आले व सीटवर पेट्रोल टाकून बस पेटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विशेष काही नुकसान होण्यापूर्वीच एस. आर. पी. ने जमाव पांगविला व आग विझवून बस नजीकच असलेल्या डेपोत सुरक्षित पोचविण्यात आली.

जमाव व एस. आर. पी.च्या दरम्यान मग दगडाचे युद्ध सुरू झाले. दोन्ही बाजूकडून दगडांचा तुफान मारा करण्यात आला. जमावाचा जोर जास्त असल्यामुळे एस. आर. पी.ला युद्धभूमीतून पळून जावे लागले. थोड्याच वेळात एस. आर. पी.ची बंदुकधारी नवीन कुमक आली व रंग पालटला. काय घडत आहे किंवा काय घडणार आहे हे

कळावयाच्या आधी गोळीबार झाला व पहिला बळी होण्याचा मान मिळाला दयानंद कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी हणमंत गायकवाडला. जमाव सैरावैरा धावू लागला व बहुतेकांनी कॉलेजचा आसरा घेतला.

भर रस्त्यावर हणमंत गायकवाड तडफडत होता. कॉलेजचे प्राचार्य श्री. पुरोहित व वार्ताहर श्री. बटुक मेहता पाण्याचा ग्लास घेऊन पुढे झाले पण त्यांना मज्जाव करण्यात आला. एस. आर. पी. च्या माणुसकीचे हे एक दर्शन. गायकवाड व त्याचे अन्य जखमी साथी भर रस्त्यावर वेदनांनी व्याकूळ होऊन गुरासारखे तडफडत-ओरडत असताना त्यांना दवाखान्यात पोचते करण्याइतपत माणुसकीदेखील एस. आर. पी.ने दाखविली नाही. पोलीस व एस. आर. पी. च्या गाड्या नवीन कुमक आणण्यासाठी धावत होत्या. जखमीकडे लक्ष देण्याइतका वेळ त्यांना होताच कोठे? शेवटी कृतीसमितीचे काही सदस्य एस. आर. पी च्या मनाइस न जुमानता धैर्याने पुढे झाले व त्यांनी जखमींना उचलून दवाखान्यात पोचविले.

नवीन कुमक आल्यावर एस. आर. पी. ने दयानंद कॉलेजवर अक्षरशः चढाईच केली व जो दिसेल त्याला झोडपण्यास सुरुवात केली. विद्यार्थी, प्राध्यापक, जमावातील आसऱ्यासाठी पळून आलेले अन्य सारे एकाच मापाने मोजले गेले आणि माप होते एस. आर. पी. च्या दंडुक्याचे. दयानंद कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. नाईक (वय सुमारे ६०) तरुणांना लाजवील ह्या तडफेने हा धिंगाणा थांबविण्यासाठी सरसावले पण एस. आर. पी. च्या चार-सहा फटक्याबरोबर खाली कोसळले.

दरम्यान वातावरण बिघडू नये या उद्देशाने कृतीसमितीने त्या दिवसापुरते आंदोलन मागे घेतले व सत्याग्रहींना घरी जाण्याची विनंती करण्यात आली. कृतीसमितीची ही दुसरी चूक. पोलीस स्टेशन व तहसील समोर असलेला एस. आर. पी. चा ताण कमी झाला व तेथे तैनात असलेली मंडळी दयानंद कॉलेजकडे बाकी कार्यभाग उरकण्यासाठी पाठविण्यात आली. एकच गोंधळ माजलेला होता. कॉलेजकडे असलेला जमाव माराला घाबरून मुख्य रस्त्याने गावाकडे पळत सुटला व कॉलेजकडे काय घडले हे पहाण्यासाठी गावातील काही बघे मंडळी त्याच रस्त्याने कॉलेजकडे निघाली काय घडले व काय घडत आहे हे कोणालाच कळत नव्हते.

आतापर्यंत हणमंत गायकवाडच्या हृदयाची धडधड शांत झाली होती व ती बातमी दवाखान्याच्या बाहेर न पडू देण्याचा अटोकाट प्रयत्न करूनही ती वाऱ्यासारखी पसरली. संतापाची लाट चारी दिशेने फैलावत गेली. गोंधळ वाढतच होता. संतप्त जमाव कधी गांधी चौक, कधी बस स्टॅन्ड, कधी हनुमान चौक असा टोळक्या टोळक्यांनी फिरत होता. एस. टी. स्टॅंडवर काही बसेस उभ्या होत्या व तेथील परिस्थितीवर एस. आर. पी. चा संपूर्ण ताबा असताना देखील सुरक्षिततेची

कोणतीही व्यवस्था न करता या गाड्या डेपोकडे पाठविण्यात आल्या. येथे हे नमूद करणे आवश्यक ठरेल की एस. टी. डेपो दयानंद कॉलेजला लागूनच आहे व संतप्त जमाव एस. टी. स्टँड व कॉलेज ह्या रस्त्यावरच फिरत होता. या बसेसपैकी एक बस याच रस्त्यावर असलेल्या पोलीस स्टेशन समोर उभी करण्यात आली व तिचे विशेष काहीच नुकसान झाले नाही.

भर रस्त्यावर काही लहान लहान मुलांनी बसेस अडविल्या. ड्रायवर उतरून चालते झाले [त्यांना तसे करावयास सांगितले असल्यास न कळे.] सुमारे तासभर त्यांची मोडतोड करून त्या पेटवून देण्यात आल्या. असंख्य एस. आर. पी. ची मदत घेता येण्यासारखी असूनदेखील इकडे कोणी ढुंकून देखील पाहिले नाही. उलट आग विझवणारे बंब आले असताना त्यांना सुरक्षिततेची व्यवस्था करण्याचे नाकारले गेले.

दरम्यान गांधी चौक, हनुमान चौक, बस स्टँड, झिंगनचा मठ येथे पोलिसांनी गोळीबार केला. हे सर्व गोळीबार आयोगाने असमर्थनीय ठरविले आहेत. पंढरीनाथ कोळी मानेत गोळी लागून मेला. कितीतरी जखमी झाले. एस. आर. पी. च्या दंडुक्याचा प्रसाद तर किती लोकांना मिळाला याची दुर्दैवाने कोठेच नोंद नाही.

गायकवाडच्या छातीत गोळी लागली होती तर कोळींच्या मानेत. इतरही बहुतेकांच्या जखमा शरीराच्या वरच्या भागातच होत्या हे एक सत्य आहे. कारण नसताना एकट्या दुकट्याला पकडून चोप दिला गेला. जागोजाग अश्रुधुराच्या कांड्या—अनावश्यकच—फोडण्यात आल्या. स्वातंत्र्य सैनिक राऊत यांच्या घरात घुसून त्यांच्याकडे असलेल्या मुलांना मारहाण करण्यात आली व अर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहण्यात आली. बिचाऱ्या स्वातंत्र्य सैनिकाला. गायकवाडच्या दुर्दैवी पित्याला सूचना देण्यासाठी जात असलेल्या श्री. पाठकांना बेदम मार दिला. दहशतीच्या वातावरणात कशीबशी संध्याकाळ झाली:

आमदार श्री. शिवराज पाटील केव्हातरी दुपारी लातुरला पोचले. शांतता प्रस्थापित करण्याचा थोडा बहुत प्रयत्न त्यांनी केला पण अनावर झालेल्या जमावाने त्यांच्याच दिशेने थोडी दगडफेक केली. आपल्या प्रयत्नास यश येत नाही असे पाहून की अनावर झालेल्या प्रक्षुब्ध जमावाच्या भीतीने—कोणास ठाऊक—श्री. पाटील यांनी आपल्या घरात जी दडी मारली ती काही दिवसासाठीच. श्री. सोनवणे मुंबईत होते.२५ तारखेच्या रात्री बातमी कळाल्याबरोबर गाडीची व्यवस्था न झाल्याने निघू शकले नाहीत. दुसऱ्या दिवशी निघून ढोकी साखर कारखान्याचा पाहुणचार घेत ते तिसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता लातूरला पोचले. जनतेचे प्रतिनिधी या नात्याने जी तडफ व धैर्य दाखविले गेले पाहिजे होते त्याचा अभाव दोन्हीकडे दिसून आला. कृतीसमितीची बहुतेक मंडळी

अशीच तोंड लपवून बसली हे सत्य देखील नाकारता येण्यासारखे नाही.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २६ ऑगस्टला एस. आ.र. पी. ने आपल्या दंडुकेशाहीचा खरा परिचय लातूरकरांना दिला. घराघरात घुसून, मन मानेल तसा अत्याचार त्यांनी केला. लोकांच्या मौल्यवान वस्तू देखील त्यांनी चोरल्या. अशा कितीतरी तक्रारी सांगण्यात येतात–नोंदविल्या देखील गेल्या आहेत. हा स्वैराचार बिनधोकपणे पार पाडता यावा ह्यासाठी का कोण जाणे, शहरात संचारबंदी (curfew) पुकारली गेली. दिवसभर एस. आर. पी. चा धिंगाणा चालू होता. लातूरच्या जनतेचा कोणीच त्राता नव्हता. एस. आर. पी. च्या दंडुक्याच्या कृपेने किती लोक जखमी झाले याची नोंदच नाही.

दरम्यान शासनाने न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले. भरपूर मार खाऊन हळूहळू लातूर शांत झाले. एस. आर. पी. चे अत्याचार, बळाचा अतिरेकी वापर, चोऱ्या आदी प्रकरणाची चौकशी करण्याचे शासनाने नाकारले. आयोगाचा अहवाल सादर झालाच आहे. खात्यातर्फे होणारी चौकशी कितपत निःपक्षपाती होईल व संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना काय शिक्षा होईल हे सांगणे कठीण. फार तर बदली होईल किंवा आंदोलन चिरडून टाकल्याबद्दल बढतीही होईल ! कोण जाणे ?

पण तरी देखील ह्या नाट्याचे खरे सूत्रधार, ह्या दुर्दैवी घटनेला जबाबदार असलेले खरे गुन्हेगार समाजात उजळ माथ्याने वावरत राहतील. त्यांना कोण शिक्षा करणार ? त्यांना जाब विचारणारा आहे का कोणी ?

लातूरला होत असलेले एस. आर. पी. चे दुसरे डिव्हिजन नांदेडला ज्यांच्यामुळे गेले त्यांना आहे का काही शिक्षा ? गुणवत्तेवर दिलेला तज्ज्ञ समितीचा अहवाल स्वीकारूनही डिव्हिजन लातूरला न सुरू करणाऱ्या शासनाला आहे का कोणती शिक्षा ? आहे का कोणी मुख्य मंत्र्यांना जाब विचारणारा की तज्ज्ञ समितीचा निर्णय का राबविण्यात आला नाही, किंवा डिव्हिजनच्या फाळणीची अत्यंत गैरसोयीची व खर्चीक योजना का मांडली गेली ? व संबंधित मंत्री व परिवहन मंडळाचे कार्यवाह यांचा याबाबत का सल्ला घेतला गेला नाही ? दोन-अडीच वर्षे न्यायाची अपेक्षा ठेवून नंतर चालू केलेले आंदोलन पुरते तीन महिने शांतपणे चालू होते तेव्हा शासनाने का कानाडोळा केला या बाबतीत ? व शेवटी आंदोलन उभे करताना जनतेपुढे मिरवायची हौस असलेले पुढारी अडचणीच्या वेळी कोठे दडून बसले होते ? आहे का त्यांच्यासाठी शिक्षेची सोय ?

ह्या प्रश्नांची उत्तरे आज कोणीच देऊ शकत नाही. आजच्या तरुण पिढीच्या मनावर जी मरगळ आलेली आहे, ती जाईल का कधी ? थंड झालेली ही तरुण मने पेटून उठतील का कधी ? हे घडल्याशिवाय–न जाणे कधी घडेल ते–ह्या प्रश्नांची उत्तरे शोधणे निरर्थक आहे.

● ● ●

# कलकत्ता मेल

सौ. तारा पंडित

## दोन मने

हावऱ्याच्या स्टेशनात उतरल्यानंतर ठिकठिकाणी तुम्हाला पोस्टर्स दिसतील. त्यावर अक्षरे असतील VISIT SHANTINIKETAN आणि खाली एक चित्र असेल नृत्यांगनेचं.

खरोखर शांतिनिकेतन काय आहे? प्रवाशांसाठी – विशेषत: परदेशच्या प्रवाशांसाठी एक प्रेक्षणीय ठिकाण की एक शिक्षणसंस्था? ते प्रेक्षणीय ठिकाण आहेच पण एका विवक्षित मर्यादेपर्यंतच. तुम्ही टागोरांचं कर्तृत्व बघण्यापुरतेच जाणार असाल तरच ते प्रेक्षणीय ठिकाण. पण स्वत:च्या करमणुकीसाठी नृत्यनाटयादी कार्यक्रमांची अपेक्षा करणार असाल तर मात्र प्रेक्षणीय ठिकाण म्हणून शांतिनिकेतनची जाहिरात होऊ नये हेच उत्तम.

शांतिनिकेतनमध्ये नृत्यनाटयसंगीत यांना जरूर महत्त्व आहे, पण टागोरांनी घालून दिलेल्या नियमावलीमध्ये बसेल तेवढेच. आणि म्हणून वेळीअवेळी येणाऱ्या प्रवाशांसमोर येथील मुलींनी नाचावे व घटकाभर पाहुण्यांची करमणूक करावी असा त्याचा अर्थ होत नाही.

बंगाली मन याबाबतीत थोडसं दुखावलं आहे. शांतिनिकेतनच्या जाहिरातीमध्ये नाचणाऱ्या मुलींचे चित्र का म्हणून असावे? ते मन चिडून ओरडले– "फाडून टाका या जाहिराती. वेळीअवेळी परक्या लोकांसमोर इत:पर आमच्या मुली नाचणार नाहीत."

नेमके ह्याच वाक्याचे पडसाद उमटलेले कानावर आले ते दूरवरच्या जंगलातून, अहिरी नामक गावच्या आदिवासींच्या राजाने काढलेल्या उद्गारातून. तो म्हणाला –

'मुंबईचे गव्हर्नर आले होते परवा. मला म्हणाले तुमच्या लोकांचा नाच बघायचाय्. बोलवा त्यांना. मी स्पष्ट सांगितलं. आमचे लोक इकडे येणार नाहीत. (नाच बघून घटकाभर स्वत:ची करमणूक करून घ्यायला यांना हवं असतं. परंतु माझ्या माणसांच्या समस्यांचा मात्र कोणीच विचार करीत नाही.) नाच पहायचाच असेल तर तिकडे चलावं लागेल – इंद्रायणीच्या पैलतीरी. तुमची गाडी जाऊ शकणार नाही. मैलचे मैल पायी चालावं लागेल जंगल तुडवीत नि नाले ओलांडीत. तयारी असल्यास चला. नाच दाखवीन. पण आमचे लोक इथे तुमच्यासमोर येऊन नाचणार नाहीत.'

विचाराचा हा एकच धागा...त्याचे एक टोक शांतिनिकेतनमध्ये तर दुसरे अहिराच्या दाट जंगलात. विचार तोच पण त्याचा उच्चार सुशिक्षित, सुसंस्कृत

वाणीने एकीकडून केला तर दुसरीकडून तोच निनाद जंगलातील आदिमानवाच्या मुखातून उमटला. ही दोन मने अगदी भिन्न संस्कारांवर पोसलेली पण त्यांची विचारसरणी मात्र एका विशिष्ट बाबतीत जुळणारी. जणु दोन बिंदूंना जोडणारी एक सरळ रेषाच ! ●

## नॉन्सेन्स !

तुम्ही खरे बंगाली असाल तर तुम्हाला रवींद्रसंगीताचे ज्ञान असायलाच हवं असं एक प्रचलित मत. त्यासाठी आईवडील फार खबरदारी घेतात हं. लहानपणीच आपल्या मुलांना–विशेषत: मुलींना क्लासमध्ये पाठवायला सुरुवात करतात. अलीकडे हे एक फॅडच निघालंय्. त्यामुळे ठिकठिकाणी अशा रवींद्र-संगीत शिकवणाऱ्या संस्था जोरात चालतात, निरनिराळ्या विभागात त्यांच्या अनेक शाखादेखील असतात. परंतु तिथे शास्त्रीय संगीताचा नामनिर्देशही आढळणार नाही. तिथे शिकवतात फक्त रवींद्रसंगीत. त्या संगीताच्या चाली अगदी तश्शाच पद्धतीने म्हटल्या पाहिजेत असा दंडक आहे. त्यासाठी तुमच्याजवळ डिप्लोमा असणं आवश्यक आहे. तुम्ही निदान वर्षभर तरी एखाद्या गुरुकडून रवींद्र संगीताचे धडे घेतले असले पाहिजेत. तरच समारंभामध्ये तुम्ही गाऊ शकता. एरवी तुम्हाला चांगल्या प्रकारे ते म्हणता येत असलं तरी काही उपयोग नाही !

आता माझी मुलगी अगदी बंगाली लोकांसारखंच रवींद्रसंगीत म्हणू शकते. ते ऐकून बंगाली लोकसुद्धा थक्क होतात. तिचं तोंड भरून कौतुक करतात. मग विचारतात–कॉलेजमध्ये...'

'तिला क्लासमध्ये न शिकताच म्हणता येतंय्. ऐकून ऐकून.' यावर ते लोक म्हणतात – 'छे, छे ! तसं नाही चालणार, आता तरी तुम्ही तिला क्लासमध्ये घाला.'

मी ऐकून घेते. म्हणते – 'ठीक आहे घालू.' मात्र मनात म्हणते – 'जर उत्कृष्ट म्हणता येतय् तर क्लासची गरज काय ? नॉन्सेन्स !'

हे माझं मत झालं. आता एक बंगाली मत ऐका. हा माणूस म्हणतो –'आमचे लोक नं, अगदी मूर्ख आहेत. त्यांना क्लासचंच वेड भारी. क्लासमध्ये गेल्यानेच रवींद्रसंगीत बरोबर म्हणता येतं हे कशावरून ? उलट रेकॉर्डस् तर सर्वत्र मिळतात. त्यावरून शिकूनसुद्धा उत्तम प्रकारे म्हणता येऊ शकतं. फार काय, क्लासला न जाणारा एखादा मुलगा किंवा मुलगी क्लासवाल्यांपेक्षा जास्त चांगलं शिकेल हे सिद्ध करून दाखवता येईल. रवींद्रसंगीत आज नव्याने का म्हटलं जात आहे ? सैगल, काननदेवी, हेमंत मुखर्जी ह्यांनीसुद्धा रवींद्रांची गीतं म्हटलीत ना ? ते कोणत्या क्लासमध्ये शिकले सांगा ? आणि आताही क्लासमध्ये शिकवणाऱ्या प्रत्येक शिक्षकाजवळ डिप्लोमा आहेच असं नाही. मग ह्या नव्या पिढीवर क्लासची जबरदस्ती का म्हणून ? नॉन्सेन्स !!'

## अभिनव नियतकालिके

वृत्तपत्रं आणि नियतकालिकांचे बाबतीत मराठी भाषेचा दुसरा क्रमांक लागतो असं नुकतंच कुठेतरी वाचल्याचं आठवतं. बंगाली भाषेचा नंबर त्यापेक्षा जरा खालचाच आहे. पण बंगाली भाषेत पूर्णतः काव्याला वाहिलेली अनेक मासिकं आहेत तशी इतर भाषांमध्ये असल्याचं ऐकिवात नाही. मराठीत पाहिल्याचं स्मरत नाही. बंगालीत फक्त कवितेने व्यापलेली अशी बरीच नियत-कालिकं आहेत. त्यांची नावही छान आहेत म्हणून उल्लेख करावासा वाटतो.

एक आहे 'गानगंगोत्री' शंतनु दास ह्यांनी संपादित केलेलं. नवोदित कवींना ह्यात सहजसुलभ शिरकाव मिळू शकतो. 'एकाक' नावाचे मासिक गेली ३२ वर्षे प्रसिद्ध होत आहे. प्राध्यापक–कवी शुद्धसत्य बोस हे त्याचे प्रचलित संपादक. 'मृत्तिका' नावाचं मासिक नव्याने सुरू झालेलं आहे. श्री. भवानी मुखपाध्याय नावाचे विख्यात साहित्यिक ते चाल-वतात. कल्याण चटर्जींचे 'सत्तरेर कविता' नाविन्यपूर्ण आहे. स्वतःचे ढोल पिटवणाऱ्यांविरुद्ध कवितेचा तीक्ष्ण चाकू ते वापरतात. 'अनयादिन' हे संपूर्णपणे नवतरुणांच्याच निर्मितीने व्यापलेले दिसेल. ह्यात कवितेचे नवनवे प्रयोग आढळून येतात. एक 'कविता-कंठ' आहे तर एक 'अन्विष्ठ' म्हणून आहे. एका मासिकाचे नावच 'विचित्रा.'

एक आहे 'अणु' नावाचे. एक 'नवांकुर' नावाचे. ही सारी छोटी नियतकालिके – बहुधा मासिकेच – नवोदित कवींना भरपूर वाव देणारी असल्याने कौतुकास्पदच आहेत असे म्हणायला हरकत नाही. ●

## बुलवर्कर

सकाळची वेळ. शाळा, कॉलेज व ऑफिसमधील लोकांना घेऊन बसेस वेगाने धावत होत्या. ज्यांना जागा मिळत नव्हती ते लटकत जात होते. फूटबोर्डावर उभे राहून फुकट प्रवास करण्यात तरबेज असलेल्यांना आत घुसण्याची गरज भासतच नव्हती. आपला स्टॉप आला म्हणून ती तरुणी गर्दीतून धक्के देत मार्ग काढीत बसच्या दारापाशी पोचण्यासाठी धडपडत होती. वाटेतले लोक लवकर सरकत नव्हते. रागाने तिने एकाला धक्का दिला. तो दुसऱ्याच्या नि दुसरा तिसऱ्याच्या अंगा-वर कोसळला. उतरता उतरता तिच्या कानावर शब्द आले–

'डब्रा! (वा!) बुलवर्कर बेश काज दियेछे रे!' ● ● ●

विधानसभेतल्या प्रश्नोत्तरांवर आधारित–

# अजब तुझे सरकार !

## दुष्काळ निवारण प्रसिद्धी कार्य खर्चाची आकडेवारी

### सु. ल. सोमण

प्रश्न क्रमांक १५३१६ : दि. ७ ऑगस्ट, १९७३

प्रश्न : आ. श्री. श्री. द. नातू, गुहागर

सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ?

१. १ एप्रिल १९७२ ते १ एप्रिल १९७३ दरम्यान राज्य शासनाच्या प्रसिद्धी संचालनालयातर्फे एकंदर किती पोस्टर्स, फोल्डर्स, पुस्तिका व इतर नियतकालिके प्रसिद्ध करण्यात आली ?

२. वरीलपैकी किती किमतीचे साहित्य शासकीय मुद्रणालयात छापण्यात आले व किती किमतीचे साहित्य इतर मुद्रणालयातून छापून घेण्यात आले ?

३. एकंदर प्रसिद्धी साहित्यापैकी दुष्काळ टंचाई निवारण कार्याशी संबंधित अशा प्रसिद्धी साहित्याच्या छपाईचा खर्च किती आहे. ?

**उत्तर : मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक**

१ व २ : या कालावधीत महाराष्ट्र-संचालनालयातर्फे भितीपत्रिका, घडी-पत्रिका, पुस्तिका व नियतकालिके इत्यादी एकंदर ४७ प्रकाशने प्रसिद्ध करण्यात आली. त्यांचा एकूण खर्च ८,९५,८११·६७ रुपये असून हे सर्व साहित्य शासकीय मुद्रणालयातूनच छापून घेण्यात आले.

३ : यापैकी दुष्काळ टंचाई निवारण कार्याशी संबंधित अशी १२ प्रकाशने प्रसिद्ध करण्यात आली असून यांचा छपाईचा खर्च २७,५७५·७५ रुपये आला.

गेल्या वर्षीचा दुष्काळच एवढा मोठा होता की, त्याच्या निवारण कार्यातच फार मोठा वेळ गेला. अर्थात. सगळा वेळ तिकडे गेल्यावर त्याच्या प्रसिद्धी-साठी तेवढासा वेळच कुठे होता ? म्हणूनच, केवळ कर्तव्यदक्षतेपोटीच, एवढ्या मोठ्या दुष्काळाच्या निवारण-कार्याच्या प्रसिद्धीसाठी एकूण जवळ जवळ ९ लाख रुपयांपैकी २७ हजारच खर्च झाले !

उरलेल्या ८॥ लाखाचा तपशील, नातूसाहेब तुम्ही विचारला नाहीत, Thanks हं !

एकूण शासकीय प्रसिद्धी कार्यासाठी तरी कागद विपुल उपलब्ध आहे म्हणायचा !

## महागाई जीवन निर्देशांक महागाईशी संबंधच काय ?

प्रश्न क्रमांक : १६८६४ : दिनांक १६ ऑगस्ट, १९७३

प्रश्न : आ. श्री. प्रमोद नवलकर, गिरगाव, मुंबई

सन्माननीय कामगार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय.

१. महागाई जीवन निर्देशांक काढण्याच्या सदोष पद्धतीबाबत शासनाकडे काही कामगार व कामगार संघटनाकडून तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत, ही गोष्ट खरी आहे काय ?

२. असल्यास अशा स्वरूपाच्या किती तक्रारी गेल्या वर्षभरात नोंदविण्यात आल्या आहेत व त्यांच्या तक्रारीचे स्वरूप काय आहे ?

३. या तक्रारी निवारण्याबाबतत कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्याचे ठरविले आहे ?

**उत्तर : कामगार मंत्री श्री. नरेंद्र तिडके**

१. होय.

२. एक. मुंबई केंद्राच्या निर्देशांकात मूलभूत वर्षी ठरविलेल्या अन्नधान्याच्या परिमाणाप्रमाणे मुंबईतील शिधा वाटपाच्या दुकानातून अन्नधान्य दिले जात नाही व त्यामुळे निर्देशांक सदोष झाला आहे अशा स्वरूपाचे हे निवेदन आहे.

३. या प्रश्नाचे किमती व जीवनमूल्य निर्देशांकाकरिता केंद्र शासनाने नेमलेली तांत्रिक सल्लागार समिती परीक्षण व विचार करीत आहे.

'नुकत्याच जाहीर झालेल्या निर्णयानुसार जुलै १९७३ पेक्षा ऑगस्ट १९७३ मधील निर्देशांक कमी दाखविण्यात आला आहे. ऑगस्टमध्ये प्रत्यक्षात सर्व वस्तूंचे भाव भरमसाठ वाढले असता, महागाई जीवन निर्देशांक कमी झाल्याची घोषणा झाल्याने सर्व कामगार संतप्त झाले असून, ह्या विरूद्ध लढा उभारण्याचे डाव्या संघटनांनी ठरविले आहे.'

**१३।१४ नोव्हेंबर, ७३ ला वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या बातम्यांचा गोषवारा.**

'ठाण्यासाठी नवा महागाई निर्देशांक (म्हणजे मुंबईपेक्षा कमी !) ठरविण्याच्या धोरणाविरूद्ध ठाण्यातील ४०,००० कामगारांच्या लढ्याची घोषणा.'

एक बातमी २२।११।७३

एका वल्लीची खास प्रतिक्रिया : 'महागाई वाढू द्यायची, निवडणूक फंडासाठी ! निर्देशांक कमी करायचा निवडणूक फंडासाठी !! फंडावर निवडणुका जिंकायच्या, ह्या दोहोंच्या कात्रीत जनतेला पकडायसाठी !!!

## जिल्हा सहकारी भू-विकास बँकांचं प्रचंड(?) कर्जवाटप !

प्रश्न क्रमांक १७५५९ दि. २० ऑगस्ट १९७३

प्रश्न : आ. श्री. मा. रा. कापगते, साकोली.

आ. श्री. वि. ल. धोटे, राजूरा

सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

१. चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यात सहकारी भू-विकास बँकांकडे सन १९७१-७२ व १९७२-७३ मध्ये शेतकऱ्यांनी किती कर्जासाठी मागणी केली व त्यापैकी किती रक्कम वितरीत झाली ?

२. कर्ज कमी प्रमाणात वितरीत झाले असल्यास, त्याची कारणे काय ?

**उत्तर : सहकार मंत्री श्री. यशवंतराव मोहिते.**

१. सन १९७१-७२ व १९७२-७३ मध्ये शेतकऱ्यांनी केलेली कर्जाची मागणी व वितरीत केलेली रक्कम खालील प्रमाणे आहे.

| जिल्हा | मागणी रुपये | वितरण रुपये |
|---|---|---|
| | सन १९७१-७२ | |
| क. भंडारा | ६४,७८,१५० | ६,५५,००० |
| ख. चंद्रपूर | ३४,६६,९०० | ७४,८५० |
| | सन १९७२-७३ | |
| क. भंडारा | ९८,१०,१०० | ३,६९,१५० |
| ख. चंद्रपूर | ४१,२६,४११ | १७,९१,१५० |

२. कर्ज वितरण कमी झाल्याची कारणे खाली दिल्याप्रमाणे आहेत.

१. सन १९७१-७२ व १९७२-७३ मध्ये वर्षाचे सुरुवातीला मंजूर होऊन वाटपाकरिता जे अर्ज शिल्लक होते त्यांना पहिले प्राधान्य देण्यात आले.

२. जिल्हा बँकांना शिखर बँकेकडून त्यांच्या वसुलीच्या प्रमाणात रिझर्व बँकेच्या आदेशानुसार नवीन कर्जवाटपासाठी मागणीपेक्षा अपुरा पैसा उपलब्ध झाल्यामुळे मागणीनुसार कर्ज वितरण करता आले नाही.

—शेतीप्रधान भारतातील एक मान्यवर घोषणा—'जय जवान, जय किसान !'

—ज्यांनी कर्जे मागितली, त्यांनी ती उसासाठी, कापसासाठी बहुतेक मागितली नसावीत ! त्या ठिकाणी थोडी तरी निवडणुकीसाठी आशा असते !!

●

## अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र वीज मंडळ वगैरे वगैरे

प्रश्न क्रमांक : १४५५१ –

दिनांक १ ऑगस्ट, १९७३

प्रश्न : आ. श्री. गजानन लोके, परळ, मुंबई

आ. श्री. वि. स. पाटील, पालघर

सन्माननीय वीज पुरवठा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

१. अणुक्ती मंडळाचे अध्यक्ष ह्यांनी राज्यातील विद्युत वाहक यंत्रणेची पूर्ण तपासणी करून त्या पूर्णपणे सुरक्षित असल्याची खात्री करण्यात यावी अशा स्वरुपाच्या सूचना शासनाला वा महाराष्ट्र वीज मंडळाला दिल्या होत्या हे खरे आहे काय ?

२. तसेच तारापूर वीज जाळे पहाणीसाठी नियुक्त केलेल्या समितीनेही महाराष्ट्र वीज मंडळाला काही शिफारशी केल्या होत्या हे खरे आहे काय ?

**उत्तर : वीज पुरवठा मंत्री श्री. नरेंद्र तिडके–**

**उत्तर आले नाही.**

–गेलं सबंध वर्ष तारापूरहून होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या गोंधळातच गेलं. अजूनही त्याचे परिणाम भोवताहेत. तिकडे आधी लक्ष द्यावे की ह्या आमदाराच्या निरर्थक बोलण्याकडे ? अर्थात एवढ्या गडबडीत प्रश्नाच्या उत्तराची अपेक्षाच कशी करावी ?

–मात्र दरम्यान एक बातमी मात्र जरूर वाचून ठेवा हं–' २६ जानेवारी, १९७४ पासून विजेच्या दरात २५% वाढ !'

– ही दरवाढ बहुधा वरील शिफारशी अंमलात आणण्यासाठीच असावी ! ● ●


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही वरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# तत्वज्ञानी व तंत्रज्ञ एअर कमोडोर पवार यांची मुलाखत:



दादूमिया

एअर कमोडोर पवार हे भारतीयांच्या व विशेषत: मराठी भाषिकांच्या गौरवाचे स्थान आहे. पाकिस्तानात १९६३ मध्ये मिलीटरी अॅटॅची असताना त्यांनी पाकिस्तानच्या सरहद्दीवरील 'पिल बॉक्सेस्' शोधून काढल्या व त्यांची संपूर्ण माहिती भारतील सरकारला कळविली. झोपी गेलेल्या सरकारला १९६५ साली जाग आली व पवारांना दिल्लीत बसविण्यात आले. १९६५, १९७१ व १९७३ च्या हवाई हालचालींची सूत्रे पवारांनी चालविली एवढे सांगितले की त्यांच्या कर्तबगारीची कल्पना यावी. ते आता 'रिटायर' झाले असले तरी त्यांच्या मागची लष्करी कामाची कटकट व जबाबदारी संपलेली नाही. सध्या पवारसाहेब एका महत्त्वाच्या खाजगी उद्योगात काम करतात. तेथेही त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व Efficiency चा ठसा उमटविला आहे. व्यवस्थापनाची सूत्रे हाती घेतल्यावर काही महिन्यातच त्यांच्या कारखान्यातील उत्पादन त्यांनी वाढवून दाखविले.

'पवारसाहेब, लष्करात देशसेवा हे मोटिव्हेशन म्हणून उपयोगी पडते, तसे खाजगी उद्योगधंद्यात मोटिव्हेशन कोणते?' मी त्यांना विचारले.

'सरळ आहे. कामगारास त्याचा पगार व मालकास त्याचा नफा.'

'पण लष्कराप्रमाणे हे मोटीव्हेशन येथे उपयोगी का पडत नाही?'

'कारण सरळ आहे. कामगार मालकास मिळणारा भरमसाट नफा पहातो. कामगारास पाच किंवा दहा रुपये रोज मिळतात. पण सामान्य कामगारास तीन, साडेतीन रुपयांवरच पतविले जाते. आपला जीव ओतून त्याने काम करावे असे मालक कामगारांसाठी काय करतो बरे? खाजगी उद्योगधंद्यात ही फार मोठी तफावत आहे. ह्या दोघांच्या उत्पन्नात एवढी जबरदस्त दरी आहे की ती भरणे अशक्य आहे. ही दरी जोपर्यंत अस्तित्वात रहाणार आहे तोपर्यंत कामगाराची अस्वस्थता चालूच रहाणार.'

'याला उपाय?'

'तुमचा नफा कमी करा असे मालकास सांगणे हे आज शक्य नाही. कारण नफा लपविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत–विशेषत: लहान व मध्यम प्रतीच्या उद्योगपतींना. अगदी उच्च दर्जाच्या उद्योगपतींना ते सहज शक्य नाही. उदा. टाटा, मफतलाल, साराभाई, अलेंबिक. त्यांना त्यांची पुस्तके उघडी ठेवावी लागतात. अर्थात काही मारवाडी फर्म्सचे फसविण्याचे व लांडीलबाडीचे प्रकार चालूच असतात. पण हे जेवढे वर जाल तेवढे आपोआप कमी होते. कारण आपोआप मर्यादा कळू लागतात व जबरदस्तीने चांगुलपणा जन्म घेऊ लागतो.'

'जबरदस्तीने म्हणजे?'

'कामगारासाठी काही कल्याणकारक योजना कराव्यात असे नकळत ह्या उच्च दर्जाच्या उद्योगपतींवर नैतिक दडपण येऊ लागते व ते लोक समजून

काही चांगले कार्य करू लागतात.'

'समजले नाही मला.'

'या उद्योगपतींचे गणित सरळ असते. नाही तरी नफ्याचा फार मोठा वाटा सरकार करांच्या रूपाने खेचून घेणार असते. त्या ऐवजी ह्या नफ्याचा तो जादा भाग जर कामगारांच्या कल्याणकार्याकडे वळविला तर हे कामगार जास्त चांगले काम करतील, मालकाविषयी व कारखान्याविषयी त्यांना जास्त सहानभूती वाटेल व त्यातून पुन: मालकाचा फायदाच होईल.'

'तो कसा?'

'उत्पादन वाढीमुळे! उत्पादन वाढले की आपोआप नफा वाढणारच!'

'अच्छा, जबरदस्तीने होणारा चांगुलपणा तो असा! समाजवादी सरकारने त्याबद्दल ऋणी राहिले पाहिजे.

'ऋणी तर राहिलेच पाहिजे. टाटाच्या जमशेदपूरला जा. किती सवलती आहेत तेथे. काही वर्षांपूर्वी तेथील कँटीनमध्ये सहा आण्यात पहिल्या दर्जाचे भरपूर जेवण मिळत असे. वैद्यकीय सवलती, रहाण्यासाठी उत्कृष्ट बंगले किंवा फ्लॅट्स, शोफरसकट गाडी, अर्थात अधिकाऱ्यांना जास्त सवलती असतात. पण कामगारांना त्यांच्या लायकीप्रमाणे एवढ्या सुखसोयी मिळतात की भारतातील कोणाही अन्य कामगारास त्याचा हेवा वाटावा! कमी अधिक प्रमाणात उद्या, या साऱ्या जीवनातील सुखसोयी प्रत्येक कंपनीतील अधिकारी व कामगार यांना मिळणार आहेत हे नक्की!'

'तुमच्या जवानांना यातले काहीच नाही.'

'त्याचेच मला वाईट वाटते. सरहद्दीवर आमचा जवान आठ आठ तास खंदकात बर्फात बसून रहातो. बर्फ वितळवून पाणी गरम करून त्याचा चहा पितो. तेथे त्याची आई, बहीण, पत्नी किंवा इतर नातेवाईक कोणीच नसते. अशा भयंकर वातावरणात एकट्याने भुतासारखे तेथे दिवस काढायचे म्हणजे सर्वांत मोठी सजा असते. तरीही त्या जवानास आम्ही सुखसोयी काही देऊ शकत नाही. शिस्त व सतत बोलणी. बिचारा सारे तसेच सहन करतो. म्हणा दुसरा मार्गही नसतो. या जवानाच्या तुलनेत आमच्या ह्या शांततेच्या काळातील शिपायांचे, म्हणजे कामगारांचे, केवढे कौतुक चाललेले असते! आणि तरी तो समाधानी नसतोच. सारखे हरताळ किंवा नियमानुसार (म्हणजे मंद गतीने) काम करण्याच्या धमक्या! आमच्या जवानास धमकी देण्याचे स्वातंत्र्यही नाही!'

'म्हणा बरे आहे ते–'

'बरे खरेच. शिपाई मुक्त वागू लागले तर देशाची शिस्तच बिघडून जाईल. देशसेवा व देशासाठी त्याग हे दोन मंत्र शिपायाच्या मनावर आम्ही सारखे बंबार्ड करीत असतो. indoctrination म्हणा हवे तर. ब्रेनवॉशिंग म्हणा पाहिजे तर. अन्य विचार त्याच्या डोक्यात शिरतच नाही.'

'पण कामगारांच्या बाबतीत असे indoctriuation नाही करता येणार?'

'कसे करायचे, तुम्हीच सांगा ना.'

'का, जपान, जर्मनी किंवा इतर विकसित देशात, कामगार देशभक्तीने प्रेरित झालेला असतो.'

'नाही, खाजगी उद्योग म्हटला की तेथे पैसा हीच प्रेरणा ठरते. तुम्ही म्हणता त्या देशात देशभक्तीचे सर्व-साधारण माणसाचे 'स्टँडर्ड'च उंच आहे त्याला तुम्ही काय करणार? मास्तर, कारकून, मालक, अधिकारी सारेच देशभक्त असतात. तसाच काम-गारही देशभक्त असतो. आपल्याकडे देशभक्त नाहीत असे नाही पण हे सारे दळिद्री आहेत.'

'गरीब सच्चा राहू शकत नाही काय?'

'सगळेच गरीब असतील तर हा गरीब सच्चा राहू शकेल. पूर्वी असे होते. आमच्या खेडेगावी पाटलाचा मुलगा, बाप श्रीमंत असला तरी लंगोटी लावून बाहेर खेळण्यास जाई. सामान्य शेतकामगाराचा मुलगा तसाच उघडा-वागडा खेळत असे. दोघेही एकाच शाळेत शिकत. एकाच मास्तराकडून छडीचा मार खात. दोघांचाही खोराक भाकरीचाच असे. पाटलाच्या मुलाची लंगोटी जरा बऱ्या कापडाची असे व त्यास सणासुदीस पोळी व गुळंबा खाण्यास मिळे. बस्स, हाच म्हटला तर फरक. त्यामुळे कोणाच्या काही मनात येत नसे.'

'आणि आज?'

'आज सारी परिस्थिती बदलली आहे. पाटलाकडे बराच जादा पैसा खुळखळू लागला आहे. पैशाची एक मोठी वाईट सवय आहे. जरूरीच्या अनेक पट जादा पैसा मिळू लागला की तो दाखवावा असे वाटू लागते. त्यास Vulgar expression किंवा show off ची मानसिक आवश्यकता निर्माण होऊ लागते.'

'कशी?'

'तो टेरीलीनची पँट घालून फिरू लागतो. ती पँट मुंबई पुण्याहून शिवून येते. साध्या शेतकामगाराच्या मुलाच्या अंगावर कपडाही नसतो. त्याला अन-वाणी चालावे लागते. हा पाटलाचा पोरगा अँबेसेडर किंवा जीप उडवितो. तो उगीचच मुंबई पुण्यास जातो, तेथील उत्कृष्ट हॉटेलात मजा मारतो. पाटलाच्या मुलाचे शिक्षण डेहराडून किंवा सिमला येथील पब्लिक स्कूल-मध्ये होते. आणि ह्या सामान्य माण-साच्या मुलास म्युनिसिपालिटीच्या शाळेतही चटकन् प्रवेश मिळू शकत नाही. हा भयंकर फरक डोळ्यात भर-णारा आहे, तो सहजासहजी विसरता येण्यासारखा नसतो. पूर्वी रहाणीचे मान व जीवनपद्धती एक असल्यामुळे पाटलाची श्रीमंती कोणाच्या डोळ्यावर येत नसे, ती द्वेषाचा विषय होऊ शकत नव्हती. आज या Vulgar show business मुळे त्याचा काळा पैसा लोकांच्या रोषाचा, सूडाचा, रागाचा विषय बनतो.'

'वा:, फार छान सांगितलात हा

फरक आपण—'

'मी आपले माझे निरीक्षण तुम्हाला सांगितले. मला तुमच्या थियरीज् वगैरे काही येत नाहीत.'

'त्या पुस्तकांत पहावयास, वाचावयास मिळतात. विदेशी वातावरणात निर्माण झालेले सिद्धांत आंधळेपणाने आमचे अर्थशास्त्रज्ञ आमच्या गरीब बांधवावर तसेच ठोकून बसवितात व त्यातून मोठी गल्लत तयार होते. म्हणून मला तुमचे स्वतंत्र व स्वदेशी निरीक्षण जास्त पसंत आहे.'

'थँक यू—'

'आभाराचा प्रश्नच येत नाही. पण पवारसाहेब, रशियात कामगार जादा काम करतो त्याचे काय ?'

'बरा विषय काढलात तुम्ही. हा विषय सोपा करण्यासाठी मी आपले दोन अनुभव सांगतो ते नीट ऐकून घ्या.'

'सांगा.'

'पूर्वी रशियन इंजिनियर्स माझ्याबरोबर काम करीत असत. चांगली गट्टी जमल्यामुळे बरेच मोकळेपणाने बोलणे होई, वादविवाद देखील होत असे. मी नेहमी त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य नाही, तोंड उघडण्याचे स्वातंत्र्य नाही, असे बोलून चिडवीत असे. बरेच दिवस त्यांच्या मुख्याने ते ऐकून घेतले. एकदा आम्ही गाडीतून प्रवास करीत होतो. वाटेत एक भिल्लीण कामगार बाई एका झाडाखाली काटक्या दूर सारून उन्हांत तिच्या मुलास दूध पाजण्याची तयारी करीत होती. तिच्या अंगावर जेमतेम कपडे असतील नसतील. त्या रशियन इंजिनीयरने मला फक्त एकच प्रश्न विचारला, 'ती कामगार स्त्री भारतीयच आहे ना ? मी समजलो.'

'काय ?'

'तो जास्त काही बोलला नाही. पण त्या रशियनला म्हणायचे होते, रशियांत व्यक्तिस्वातंत्र्य नसेल, लेखन स्वातंत्र्य नसेल, भाषण स्वातंत्र्य नसेल, पण अशी स्थिती तेथील कामगारांची नाही. छप्पर आकाशाचे व लादी धरित्रीमातेची ! खायला ठिकाणा नाही. रशियन कम्युनिस्ट पद्धतीने तेथील सर्वसामान्य माणसास रहायला जागा, खायला दोन वेळचे अन्न व घालायला कपडे एवढी सुरक्षितता निश्चित दिली आहे. ही शाश्वती तेथील प्रत्येक नागरिकास असल्यामुळे त्याची मानसिक प्रक्रिया निराळी होणार.'

'दुसरा कसला अनुभव तुम्ही सांगणार होतात ?'

'आमच्या वर्कशॉपचा. तेथे ट्रान्झिस्टर्स, व्हाल्वज् वगैरे बरेच सुटे भाग पडले होते. आम्ही ते एका ड्रावरमध्ये सगळे तसेच ठेवले होते. महागडे सुटे भाग होते ते ! पण सारे रशियन्स असल्यामुळे आम्ही त्या सुट्या भागाचे वर्गीकरण करून रजिस्टर केले नव्हते. सुरुवातीस तसे रजिस्टर ठेवण्याची माझ्या मनात कल्पना होती. तसे मी बोलूनही दाखविले. उगीच सुटे भाग चोरीस जायला नको असे मी म्हणालो. त्यावर एक रशियन इंजिनियर म्हणाला, 'चोरी कोण करणार ?' मग माझ्या

डोक्यात प्रकाश पडला. सारा माल राष्ट्राचा. आपल्याकडे चोरी का झाली असती ? कारण तेवढे भाग बसविण्या-एवढ्या संख्येचे रेडियो सेट्स् आमच्या येथे खाजगी मालकीचे असतात. प्रत्येकास राष्ट्राने एक रेडियो दिला तर अधाशीपणा किंवा हाव ठेवायची ती कोणासाठी ? तेथे चोरी होत नाही ती पापपुण्याच्या कल्पनेमुळे नाही तर चोरीची, हाव करण्याची, संग्रह करण्याची गरज वाटत नाही म्हणून. चोरी न करणे हा आता सहज स्वभाव बनला आहे त्या राष्ट्राचा. '

' आश्चर्य आहे. '

' तुम्ही विचार करा. ही greed व Insecurity ह्या दोन भावना आपल्या राष्ट्रास खात आहेत. greed का तर उद्याची सुरक्षितता नाही म्हणून आणि उद्याची सुरक्षितता का नाही तर प्रत्येकास हाव सुटली आहे म्हणून. हे कसे थांबविणार ?'

' ही झाली साम्यवादाची आपोआप निर्माण होणारी नैतिकता. मग अमेरिका, जर्मनी, जपान वा इस्राएलसारख्या भांडवलशाही देशात अशीच सचोटी का आढळते ?'

' कारण तेथेही ' जॉब सिक्युरिटी ' आहेच. कोणीही बेकार रहात नाही. समजा, बेकार राहिलाच तर बेकारीचा पगार मिळतो व त्या पगारात दोन्ही वेळचे पोट भरते आणि दुसरे असे की हे सुटे भाग ह्या देशातही सुरक्षित राहिले असते. मास प्रॉडक्शनमुळे या भागाची किंमत इतकी स्वस्त असते व कामगारांचे वेतन एवढे प्रचंड असते की अशा फालतू वस्तूंची चोरी करणे त्यांच्या मनातसुद्धा येणार नाही !'

' साम्यवादामुळे security व त्यामुळे हाव नाही. भांडवलशाहीत पुन: सुरक्षितात व वैपुल्य म्हणजे पुन: चोरी नाही. मजा आहे दोन्ही वेगळ्या पण लोककल्याणकारी Systems ची. आपल्याकडे Worst of both the Worlds दिसते आहे. '

' या दोन्ही सिस्टिम्स यशस्वी करण्यासाठी तेथील नेते, तेथील लोक एके काळी फार झटले होते. त्याशिवाय एवढी संपन्नता येऊ शकत नाही. त्यामानाने आपल्याकडे लोक आळशी वाटतात. त्यांना काम करावयास आवडत नाही असे मला वाटते. '

' नाही, आपल्याकडे Deterrent काहीच नाही. '

' भीती हे सुद्धा फार सुंदर Work stimulus आहे. साऱ्या संस्कृती वर आल्या त्या या भीतीच्या जोरावर. नाही तर पिरामिड्स् उभे राहिले असते का ? जेत्याने जितांवर हुकमत गाजवायची, याचाच अर्थ भीती दाखवून काम करवून घ्यायचे. आता भीतीचा वापर फक्त साम्यवादी देशातून केला जातो. अर्थात् नोकरीवरून काढून टाकू ही सुद्धा एक प्रकारची भीतीच असते म्हणा. '

' तुम्ही खाजगी उद्योगात शिरल्यावर काय अनुभव आला ?'

' कसला ?'

' तुम्हाला कामगारावर कडक

लष्करी शिस्त लादावी असे वाटले का? ह्या बाबतीत तुम्हाला यश आले का?'

'मी तसा विचारच कधी केला नाही.'

'का?'

'मला माहीत होते, ही शिस्त मी लादू शकणार नाही. ते अशक्य आहे.'

'अशक्य का?'

'कारण आज सारे औद्योगिक कायदे कामगाराच्या बाजूचे आहेत. मालकाला आज सत्ता किती आहे?'

'का बरे?'

'लष्करात आम्ही कोणी आमच्या शिस्तीचा भंग केला की त्यास कडक शिक्षा देतो. खाजगी औद्योगिक समूहात शिक्षा देणे आज जवळ जवळ अशक्य होऊन बसले आहे. जास्तीत जास्त त्यास वॉर्निंग द्यायची! त्यास नोकरीवरून काढून टाकता येणे शक्य नाही. सर्वस्वी अशक्य!'

'याचा अर्थ उघड आहे. उत्पादन वाढणेही अशक्य आहे.'

'अगदी खरे आहे. पण उत्पादन वाढण्यासाठी चांगल्या, कुशल व devoted कामगारांची जरूर आहे. अशा कामगारांना पगार जास्त द्यावा लागतो. खाजगी उद्योगधंद्यात ते जमत नाही.'

'जमत नाही म्हणजे? यू मीन, कामगारांचे शोषण हाच मालकांचा धर्म आहे?'

'तसे नाही. त्यासाठी प्रगत देशातील व अविकसित देशातील औद्योगिक उत्पादनाची Anatomy तुम्हाला मला सांगावी लागेल.'

'म्हणजे?'

'हा फरक कळला नाही तर ism च्या set ideas डोक्यात घेऊन तुम्ही साप म्हणून भुई धोपटत बसणार याची मला खात्री आहे. येथले सारे नेते, कामगार पुढारी व समाजसेवक तेच करीत असतात. पुस्तकात वाचलेल्या phrases ची केवळ पोपटपंची—आपल्या व परक्या देशातील औद्योगिक उत्पादनाच्या conditions मधील फरक लक्षातच कोणी घेत नाही!'

'कोणचा फरक?'

'विकसित देशात कच्चा माल स्वस्त पडतो. आमचा सारा पैसा या कच्च्या मालातच अडकतो.'

'पण आपल्याकडे मजूरी स्वस्त आहे.'

'कबूल, विकसित देशांना मजुरी मारून टाकते.'

'त्याचे आकडे सांगितले तर बरोबर ध्यानात येईल.'

'अमेरिका किंवा जर्मनीत उत्पादनाचे कोष्टक पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कच्चा माल | २०% |
| मजूरी | ६०% |
| नफा | २०% |

ह्या महागड्या मजुरीमुळे आज विकसित देशात Automation चे प्रस्थ वाढले आहे. खूप मोठ्या कारखान्यात पहावे तर दहा पंधरा माणसेच दिसतात. जपान, इटली वगैरे ठिकाणी मजुरी स्वस्त असते. म्हणून अमेरिकन किंवा जर्मन कारखाने ह्या स्वस्त मजू-

रीच्या देशात आपल्या कारखान्यांच्या शाखा काढतात व तो माल अमेरिकेत पुनर्निर्यात करतात. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे आपल्याकडील वाटाचा बुटांचा कारखाना.'

'आपल्याकडे उत्पादनाचे कोष्टक कसे असते?'

'आपले कोष्टक पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कच्चा माल | ७०% |
| मजूरी | १०% |
| नफा | २०% |

'आपला कच्चा माल एवढा महाग?'

'तीच तर गंमत आहे. विकसित देशांना एक मोठा फायदा असतो. त्यांच्याकडील कच्चा माल तर ते स्वस्त भावाने घेतातच पण इतर अविकसित देशातून त्यांना हा कच्चा माल अतिशय स्वस्त मिळतो. ह्या देशात तयार यंत्रे वगैरे विकली की मग सारा नफाच नफा! जपान आपल्याकडून पहा ना धुळीच्या भावाने लोखंड सतत विकत घेत असते. काय दुर्दैव आहे, एवढे लोखंड जवळ असून आपल्याकडे त्या मानाने पक्का माल म्हणजे पोलाद कमीच तयार होते!'

'या दोन विभिन्न उत्पादनाच्या patterns मुळे आपल्या औद्योगिक मानसशास्त्रात काय फरक पडला आहे?'

'फार मोठा. दोन्ही कोष्टके पहा. दोघेही उद्योगपती नफ्याचे प्रमाण तेच ठेवणार. आपल्याकडे कच्चा माल एकदम महाग. लायसेन्स, दिल्लीत मंत्रालयातील अधिकाऱ्यांना लागणारी लांच, आपल्या शहरातील एक्साईस, म्युनिसिपल, इंडस्ट्रिअल, सेल्स टॅक्स, इन्कम टॅक्स वगैरे सर्व ठिकाणी ठेवावे लागणारे 'पेपरवेट' या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्या तर तो कच्चा माल भलताच महाग पडतो. मग आमचे उद्योगपती काटकसर कोठे करणार? तर मजुरीत! त्यासाठी कमी दर्जाचे मजूर कामावर ठेवायचे, त्यांना कमीत कमी मजुरी द्यावयाची हे प्रकार चालतात. त्याचा परिणाम आमच्या उत्पादनावर होतो!'

'विकसित देशात मोठ्या प्रमाणावर मालाचे उत्पादन काढतात. कारण त्यांना प्रचंड नफा मिळतो. पण साम्यवादी देशांचे काय?'

'तेथे तीच गोष्ट. कच्चा माल इतर कम्युनिस्ट वसाहतींपासून फार स्वस्त दरात मिळतो. किंवा मित्र राष्ट्रांपासून. उदा. इजिप्तने शस्त्रांच्या खरेदीसाठी-पुढील पन्नास वर्षांच्या कापसाचे पीक रशियास आगाऊच विकून टाकले आहे! चीनने लंकेपासून अशा स्वस्त दराने रबर विकत घेतले आहे.'

'कम्युनिस्ट देशात मजूरी?'

'पाश्चिमात्यांपेक्षा कमी पण भारत किंवा इतर अविकसित राष्ट्रांपेक्षा जास्त असे मजुरीचे दर तेथे असतात. पण कम्युनिस्ट राष्ट्रात खरोखर समानता आपणास पहावयास मिळते. ड्रायव्हर व अँबेसेडर चीनी व रशियन एम्बसीमध्ये खरोखर एका टेबलावर बसून जेवताना मी पाहिलेले आहे. अधिकारी व मजूर यांच्या पगारात

विशेष फरक नसतो. त्यामुळे तेथे द्वेष वा असूया वाटण्याचा संभव कमी. कम्युनिझम हे मोठे तत्त्वज्ञान आहे. त्या दृष्टीने ते भारतीयांना जवळ आहे. कारण दोन्ही राष्ट्रात 'हाव' ह्या शब्दाचा प्राचीन कालापासून तेथील तत्त्वज्ञानी तिरस्कार करतात. आपल्यापेक्षा त्यांचे तत्त्वज्ञान एका बाबतीत सरस आहे. ते म्हणजे तेथे कोणास insecurity नाही. रशियन लोकांशी चर्चा केली की ते कबूल करतात की त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य वगैरे काही नाही. पण ते म्हणतात, प्रत्येक पद्धतीचे काही गुणदोष असायचेच. १०० टक्के गुणी पद्धत जगात कोणती आहे? तेथे तुम्हाला तुमच्या गरजेप्रमाणे घर लहान वा मोठे मिळते. चव्हाणांसारखा फक्त दोन वा तीन लोक घरी असलेला मंत्री तेथे उगाच मोठे घर अडवीत नाही, त्याला एक बेडरूमचे घर सरकार देते!'

'आणि चीनी साम्यवादात?'

'खरे सांगायचे तर चिनी साम्यवाद हिंदु तत्त्वज्ञानास जास्त जवळचा वाटतो. एवढे जवळचे आपल्याला दुसरे काही नाही.'

'कसे काय?'

'पहा ना, माओने पहिल्यांदा भर दिला Nationalisations of sources of production वर, दुसरा भर समान वाटणीवर. माओचा तिसरा मुद्दा मोठा महत्त्वाचा आहे. तो म्हणज change of Man. हे कोणत्याच अन्य राजकीय तत्त्वज्ञानात आपणास पहावयास मिळणार नाही.'

'Change of Man म्हणजे काय?'

'माओचे म्हणणे असे की साम्यवादाचे जे काही फायदे आहेत ते खऱ्या तत्त्वज्ञानी पद्धतीने उपभोगायचे असल्यास माणूस बदलला पाहिजे.'

म्हणजे काय?'

'रशियाचे उदाहरण देतो म्हणजे कळेल. रशियात आज समृद्धी आली आहे. लगेच रशियन माणसात हाव उत्पन्न होऊ लागली आहे. हळुहळू त्याला चांगल्या गाडीची, चांगल्या कपड्याची, चांगल्या टी. व्ही. सेटची गरज भासू लागली आहे. थोडक्यात, रशियाचे हळुहळू अमेरिकनायझेशन् होऊ पहात आहे.'

'अगदी खरं.'

'तेथेही व्यसने, हिप्पी, पॉप संगीत हळुहळू चोरून शिरू लागले आहे. माओला साम्यवादाचे हे अधःपतन मान्य नाही. माओची सांस्कृतिक क्रांती तेवढ्यासाठी होती. माओने संस्कृतीच्या विरोधकांचा काटा काढला. माओ अत्यंत यशस्वी ठरला. याचे कारण, माओला त्याच्या राष्ट्राची मूल्ये जतन करून ठेवायची आहेत. संस्कृतीचे संवर्धन करायचे आहे.'

'थोडक्यात माओला 'बाईंडरी' मान्य नाही.'

'कसे बोललात? त्याची हळुहळू होणाऱ्या लोकशाही वादळावर श्रद्धा नाही. म्हणून आपल्याला त्याची क्रांती हिंसामय व क्रूर वाटते! पण त्यात त्याचा मूळ उद्देश– 'Change of Man.' हा आहे.

'साम्यवादाची ही अज्ञात बाजू तुम्ही छान सांगितली. विशेषतः त्याग शिकविणाऱ्या हिंदू तत्त्वज्ञानाशी त्याचे असलेले साम्य !'

'आपल्याकडे आपण आंधळेपणाने या राजकीय मतप्रणालींकडे बघतो. प्रचाराला बळी पडतो. आपल्या देशास नेमके काय पाहिजे याविषयी आमच्या नेत्यांतच एकमत नाही. ध्येय नक्की नसल्यामुळे साधनात गल्लत होणे सहज शक्य आहे. ध्येय नक्की असल्यास कोणतीही system आपल्या फायद्यासाठी मर्यादित स्वरुपात राबवून घ्यावयास कोणाची हरकत असणार नाही. उदा. आपल्या एवढ्या लोकसागरासाठी समृद्धी हे जर आपले ध्येय ठेवायचे असेल तर आजची विकृत, सडलेली, आळशी किंवा कामचुकार मने वा माणसे चालणार नाहीत. हाव या दुष्ट भावनेची हकालपट्टी करण्यासाठी change of Man हे अत्यावश्यक आहे व या तत्त्वास ते माओचे तत्त्व असले तरी विरोध का व्हावा हे मला कळत नाही.'

'तुम्ही साम्यवादाची चांगली बाजू मोठ्या युक्तीने सांगत आहात.'

'कोणाचीही चांगली बाजू काय आहे हे ठाऊक असायला काय वांधा आहे? साम्यवादाचे पुढील तत्त्व मला फार आवडते : Every man gives to Society his best and take whatever he needs. एवढेच उच्च व आदर्श तत्त्वज्ञान मला नाही वाटत हिंदू तत्त्वज्ञानाखेरीज अन्यत्र पहावयास मिळेल. तुमच्यात जे चागले असेल ते समाजास द्या हा केवढा सुंदर उपदेश आहे! आणि तुमची लायकी असेल, तुम्हाला जेवढे पाहिजे असेल तेवढेच घ्या–म्हणजे हाव धरू नका. हिंदू तत्त्वज्ञान वा धर्म आणखी निराळे काय शिकवितो ?'

'तुम्ही साम्यवादी दिसता–'

'जराही नाही, तसे असते तर मी खाजगी उद्योगधंद्यात का शिरलो असतो ? मला तुम्हाला सांगायचे ते हे की, समानता खरोखरीच हवी आहे ना, मग या दोन तत्त्वांचा स्वीकार करा, अंमलात आणा. भांडवलशाही पसंत असेल तर गाढवासारखे sincerely सारा दिवस काम करा, चिक्कार उत्पादन वाढवा, अमेरिकेप्रमाणे सभांतून बोलताना 'मोगल्स्, टायकून्स् अँड फेलो विलीओनर्स' अशी भाषा वापरा. पण अधलेमधले आपल्याकडे जे भयानक, ओंगळवाणे व दरिद्री समाजवादाचे स्वरूप दिसते ते झिडकारून टाका, त्याचा त्याग करा. भांडवलशाही काय किंवा साम्यवाद काय, ही दोन्ही तत्त्वज्ञाने आहेत, दोन्ही व्रते आहेत हे लक्षात ठेवा. एकात change of man चे व्रत आहे तर दुसऱ्यात अठरा तास मेहनत करण्याचे. आपला Socialism नाही, आपला Capitalism ही नाही, आपला Exploitism आहे, तत्त्वशून्य शोपणवाद. पुनः सांगतो, आपण worst of both the words स्वीकारलेले आहे. म्हणून आपण जगाच्या मागे आहोत. कोरिया व इस्राएल आपल्यापुढे आहेत. आपण तुलना करतो पाकिस्तानशी, अरब देशाशी. आपण दृष्टी ठेवली पाहिजे जर्मनीकडे, अमेरिकेकडे. काय आमच्याजवळ नाही की ज्यामुळे आम्ही मागे रहावे ?'

● ● ●

कामगार जगत

# कामगार चळवळीतले हिंसाचार : एक चिंतन !

माणूस प्रतिनिधी

सुमारे तीन महिन्यापूर्वी 'माणूस'मधून लिहिताना, मी म्हटलं होतं की 'कॅलिको–केमिकल्स' ह्या मुंबईतल्या कंपनीतली परिस्थितीं स्फोटक बनत चालली आहे. कॅलिकोतल्या कामगार संघटनांनी आणि मालकांनी वेळीच संयम दाखवून आणि शासनानेही आधीच हस्तक्षेप करून परिस्थिती आटोक्यात आणायला हवी असेही मी त्याचवेळी लिहिले होते. दुर्दैवाने ह्यातले काहीही घडले नाही. व्यवस्थापक ताठर भूमिकेत, कामगार संघटना इर्ष्येला पेटलेली तर शासन अगदी ढिम्म ! अशा अवस्थेत कॅलिकोतला कामगार आज साडेतीन महिने तिथला संप रेटतो आहे. आज तिथला कामगार अगतिक झाला आहे, आणि तितकाच चिडलेलाही आहे. त्यातनंच कॅलिकोतल्या संपाने हिंसक स्वरूप धारण केलं आहे.

कॅलिको संपात ज्या अनेक हिंसक घटना घडत गेल्या, त्यांचा कळस ३ डिसेंबरला झाला. त्यादिवशी, कामावर जाणाऱ्या 'ऑफिसर्स'ची एक गाडी धारावी इथे अडवून पेटवली गेली. श्री. अविनाश बर्वे हा तरुण अधिकारी, ह्या प्रकारात अक्षरशः जिवंत जाळला गेला. इतर दोन कर्मचारी गंभीर स्वरुपात जखमी झाले. हा लेख लिहिताना त्यांची प्रकृती अद्यापही 'क्रीटिकल'च आहे.

हा अमानुष प्रकार वास्तवात अतिशय गंभीर आहे तितकाच अत्यंत निषेधार्ह आहे ! 'कारोना साडू', 'गोद्रेज' ह्या ठिकाणच्या प्रकाराइतकाच तो, अलिकडच्या मुंबईतल्या कामगार चळवळीला मिळू पाहाणाऱ्या नव्या दिशेतला महत्त्वाचा टप्पा आहे. कॅलिको संपातल्या ह्या व संपाच्या एकूणच प्रकरणाला, मुंबईच्या वृत्तपत्रांनी फारशी प्रसिद्धी दिलेलीच नाही. त्यावर टिप्पणी तर नाहीच नाही ! (अपवाद मार्मिक, लोकसत्ता. )

आज हे प्रत्यक्ष हिंसक प्रकरण न्याय प्रविष्ट आहे; त्यामुळे त्यासंबंधीचं मतप्रदर्शन मी टाळीत आहे. परंतु एकूणच कामगार चळवळीत जे हिंसक वातावरण आज तयार होऊ पाहात आहे, त्याचा ह्या निमित्ताने थोडासा परामर्ष घ्यायला हरकत नाही.

कामगार चळवळींतले हिंसक प्रकार आज सर्वत्र वाढताहेत. त्याचबरोबर, कामगारांचे लढे, त्यातनं निर्माण होणारे संपही वाढताहेत. अगदी संप टाळण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या आर. जे. च्या संघटनांचाही ह्याला अपवाद नाही. राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान प्रत्यही संप, बंद इत्यादींवर किमान तीन वर्षांसाठी स्वेच्छा बहिष्कार कामगारांनी स्वीका-

रावा, उत्पादन वाढ करावी असं आवाहन करीत आहेत. ह्या पार्श्वभूमी-वर हे संप, बंद वाढताहेत व तेही हिंसक मार्गांनी !

हा विरोधाभास का? बांगला देश युद्ध, नंतरचा भीषण दुष्काळ ह्यामुळे एकूणत्र आर्थिक वातावरण अत्यंत दूषित झालं आहे. – प्रत्येक गोष्टीची आज कधी नव्हे एवढी टंचाई निर्माण झाली आहे. ह्या टंचाईवरचा एकमेव उपाय म्हणजे उत्पादनवाढ, हेही वादा-तीत सत्य आहे. उत्पादनवाढ हवी असेल तर, प्रथम संप, बंद, टाळेबंदी वगैरे– प्रकार टाळायला हवेत हेही ओघानेच आलं. परंतु हे सरळ, साधं तर्कशास्त्र अंमलात आणलं जात नाही ही वस्तु-स्थिती आहे, एवढंच नव्हे तर, आर्थिक अडचणींच्या गेल्या दीड दोन वर्षांच्या काळात ह्या प्रकारांचं व त्याचबरोबर कामगार चळवळींतल्या हिंसेचेही प्रमाण वाढलेलंच आढळेल.

हा जो परस्पर विरोधाभास, आज आपल्याला दिसून येतो, त्याला जबाब-दार कोण–कामगार, कामगार नेते, मालक की शासन ?

देशाची आर्थिक नाडी जी आज कमजोर झाली आहे तिची जाण काम-गारांना नाही असं म्हणणं धाष्टर्याचं ठरेल. कामगार नेत्यांना ती आहेच, कारण त्यांची भाषणं त्यांना जाणीव असल्याचं सांगून जातात. मालकांना, शासनाला जाणीव आहेच आहे कारण, त्याच जाणीवेच्या भांडवलावर ते संपाला विरोध करतात. मग एवढं असूनही हे संप, बंद वगैरे प्रकार, हिंसाचार वगैरे घडतात तरी का ?

माझ्या मते ह्या साऱ्याचं मूळ एका वस्तूस्थितीत मिळू शकेल. आज सामान्य माणूस, कामगार अतिशय चिडलेला आहे. ही ती वस्तुस्थिती आहे. सामान्य माणसाचं जीणं आज अतिशय कठीण झालं आहे. सुस्थापित कंपन्यांमधला कामगार चांगले पगार घेऊन सुखात असतो अशी एक भ्रामक समजूत आहे. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, ४०० ५०० रु. पगार मिळवणारा कामगारही आजच्या परिस्थितीमुळे कर्जबाजारी असतो. हा कर्मचारी थोडासा शिकलेला असल्याने चटकन संघटीतही झालेला असतो. आजूबाजूला तो बघत असतो. त्याला, त्याच्या बायका-पोरांना रांगा लावूनही ज्या वस्तू मिळत नाहीत त्याच वस्तूंची रेलचेलही त्याला इतरत्र दिसत असते ! त्यांच्या मुलाबाळांना साधा एखाद दुसरा सिनेमा महाग असतो तर त्याचवेळी इतर काही मुलं दिवसाकाठी ‘सोशल्स’वर, ‘बीयर’वर शंभरा-शंभराच्या नोटा उडवतानाही ‘तो पहात असतो ! हे सारं तो पहात असतो. सामाजिक न्यायही ह्याच नोटा ‘उडवणाऱ्यां’ना मिळत असतो, ह्याचीही मनोमन खात्री तो बाळगीत असतो. ह्यातूनच एकप्रकारची मनस्वी चीड ह्या वर्गाविषयी त्याच्या मनात घर करून रहाते–ह्या चिडीला जेव्हा संघटित रूप मिळतं, तिला नेत्यांकडून व मालकांकडूनही खतपाणी मिळतं तेव्हा ‘संप-बंद-टाळेबंदी’ वगैरे प्रकर-

णांना सुरुवात होते. ह्यापुढे कामगार इतका भडकलेला असतो की, पुढारीही त्याला आवरू शकत नाहीत. हिंसाचार घडतात ते ह्या अनावर चिडीतून! कॅलिकोत नेमकं हेच घडलं आहे! इतरत्रही वेळीच दक्षता घेतली नाही तर हे प्रकार घडणार नाहीत ह्याची कुणीच हमी देऊ शकणार नाही!!

कनिष्ठ श्रेणीच्या कामगाराची कहाणी ह्याहून करुण आहे. पुरेशा शिक्षणा अभावी आणि अगदीच हातावरचं पोट असल्याने हा कामगार अद्याप व्हावा तसा संघटित होत नाही. त्यामुळे त्याच्या रागालोभाची फारशी पर्वाही कुठे होत नाही. ह्या कामगाराचं जिणं आणखीनच खडतर आहे. वर उल्लेखिलेल्या वरच्या श्रेणीच्या कामगारांपेक्षाही! त्याच्या संघटनेतून जर लढा उभा राहू शकला तर काय होऊ शकतं ह्याची थोडीशी चुणूक अलिकडेच मुंबईत झालेल्या माथाडी कामगारांच्या संपाने दाखवून दिली आहे. ह्या कनिष्ठ श्रेणीच्या कामगारांशी तुम्ही बोललात तर त्याच्या अंगात भिनलेल्या चिडीची भयानकता तुम्हाला सहज जाणवू शकेल. ह्या चिडीला संघटित तोंड फोडलं गेलं तर, त्याची भीषणता कदाचित गोद्रेज, कॅलिको वगैरेंनाही मागे टाकील!

मी हे असं कुठे काही बोलायला लागलो की, माझ्या बोलण्यातून लोकांना नक्षलवादाचे, कम्युनिझमचे पडसाद उठत असल्याचे म्हणे जाणवते. पण ह्यासंबंधात मी ह्या आधीही अनेकदा 'माणूस'मधून लिहिलं आहे. आजच्या कामगार चळवळीतल्या प्रत्येक उद्रेकाला, हिंसाचाराला नक्षलवादाचं, अतिरेकी कम्युनिझमचं लेबल डकवून तथाकथित राष्ट्रवादी आणि रशियाप्रेमी काँग्रेसवालेही मोकळे होतात. माझं विश्लेषण वेगळं आहे. नवी पिढी अधिक डोळस आहे. साहाजिकच नवा कामगार अधिक जागरूक आहे. तो अधिकाधिक वाचतो आहे. भ्रष्टाचार व त्यातून येणाऱ्या श्रीमंतीला मिळणारी राजमान्यता त्याच्या नजरेतनं सुटत नाही. समाजवादाच्या गप्पा सकाळ-संध्याकाळ मारल्या जात असताना, गरीब-श्रीमंतातली दरी रुंदावत असल्याचं तो मनोमन जाणून आहे. सिनेमामुळे विलासी जगाची तोंडओळख त्याला झाली आहे. निरनिराळी 'सोशल्स', 'कॅबरेज' वगैरेंच्या वृत्तांवरून हे विलासी जग सिनेमापुरतंच मर्यादित नाही हेही तो जाणून आहे. त्यासाठी पाण्यासारखा वहावयासाठी पैसाही ह्या समाजाकडे आहे हेही त्याला माहित आहे आणि त्या संदर्भात स्वतःचं व एकूणच सामान्य जनतेचं आर्थिक-रुदन काय आहे ह्याचीही त्याला कल्पना आहे! त्यातूनच त्याच्या मनात ह्या वर्गाविरुद्धच्या भयानक अढीची बीजं रोवली गेली आहेत!

त्यामुळे ह्या मालक वर्गियातला एखादा जेव्हा कुरापत काढतो किंवा कुठल्याही कारणाने कामगारांना अप्रिय असलेले निर्णय घेतो तेव्हा कामगार संघटित होऊन त्याविरुद्ध उभा राहातो.

क्वचित क्षुल्लक कारणावरूनही आज संप होतात. त्याला कारण हे असे आहे. नेत्यांना ह्या संपांच्या पाठीशी उभंच राहावं लागतं. नेतेही अशा असंतोषांचा फायदा उठवू पाहतात. एखाद्यावेळी कारखानदार न्यायालयीन निवाडे (कामगारांच्या बाजूने असल्यास !) वा लवाद निवाडेही अंमलात आणीत नाहीत. हायकोर्ट-सुप्रीम कोर्टाच्या फेऱ्यात कामगारांचे जिव्हाळ्याचे प्रश्न वर्षानुवर्षे अडकवून ठेवून कालहरण करीत बसतात. अशा परिस्थितीतही, न्यायालयांची, समाजवादाची बूज न राखणाऱ्या कारखानदारांचीच री ओढतानाच शासन बहुधा दिसते. कामगारांची चीड वाढीला लागते ती इथे ! त्यातून काही अप्रीय प्रकार घडतात.

इथे प्रश्न येतो तो हा की, शासन, वरिष्ठ वर्गीय सर्वच जेव्हा सामान्य जनांच्या प्रश्नाकडे पाठ फिरवताना दिसतात तेव्हा कामगारांनी, सामन्य जनांनी ह्या वरच्या वर्गांनी केलेल्या आवाहनांचा कितपत गांभीर्याने विचार करायचा ? कामगारांनी जर संप, बंद टाळायचे, तर मालकांनीही कामगारांवर संपाची पाळी येणार नाही इकडे लक्ष नको का द्यायला ? औद्योगिक उत्पादन-वाढीची निकड बघून तरी निदान, शासनानेही केवळ संप चिरडण्यात कारखानदारांना सहाय्यभूत न होता, संप-कारणांच्या मुळाशी जायला नको का ?

भारतीय उद्योगपतींच्या (काही अपवाद जरूर आहेत !) कामगारांकडे बघण्याच्या एकंदर दृष्टीकोणातच आजच्या कामगार-जगतातल्या असंतोषाची बीजं आहेत. ही बीजं जोवर दूर होत नाहीत, कामगाराच्या मनात जोपर्यंत कारखानदार-कारखान्याविषयी आत्मीयता निर्माण करीत नाही, त्याला कारखान्याच्या सुखदुःखात यथार्थपणे सहभागी करून घेत नाही—किंबहुना म. गांधींनी सुचविलेली 'ट्रस्टी'ची भूमिका जोपर्यंत कारखानदार पार पाडीत नाही, तोपर्यंत मालक-कामगार संघर्ष वर्गलढ्याचंच स्वरूप धारण करणार ! आपण वाढवून दिलेल्या उत्पादनाने आपलं, राष्ट्राचं भलं होणार नाही, केवळ मालकांचाच फायदा वाढेल ही कल्पना कामगारांच्या मनात ठसली आहे. काही अंशी ती सार्थही आहे. राष्ट्रवादाच्या गप्पा म्हणूनच, ह्या संदर्भात निरर्थक वाटतात !

राष्ट्रवाद्यांनी (आणि काँग्रेसवाल्यांनीही !) कम्युनिझमला, नक्षलवादाला विरोध करताना ह्या साऱ्या प्रश्नांचा नि त्या अनुषंगानं निर्माण होणाऱ्या इतरही प्रश्नांचा नीट विचार केला पाहिजे. कामगार चळवळीत नव्यानं शिरणाऱ्या हिंसाचाराचा केवळ 'नक्षलवादी' शिक्का मारून निषेध करण्यानं काही साध्य होणार नाही. किंवा निव्वळ सेनापती थाटात मुंबईचा कलकत्ता होऊ न देण्याच्या वल्गनांनीही हा तथाकथित 'नक्षलवाद' (मात्र वास्तवात खराखुरा धुमसत असलेला असंतोष !) दडपून टाकता येणार नाही ! त्यासाठी प्रश्नाच्या मुळाशी जाऊन प्रश्नांची आर्थिक-सामाजिक उत्तरं शोधून काढली पाहिजेत ! शासन, कारखानदार (वा उद्योगपती), अर्थज्ञ, समाज-शास्त्रज्ञ, नेते, कार्यकर्ते व समस्त राष्ट्रवादी ह्या साऱ्यांवर ही जबाबदारी येऊन पडते ! एरवी कम्युनिझम (किंवा नक्षलवादही !) विरोध निष्फळच ठरणार ! !

● ● ●

तेरावा महाराष्ट्र राज्य नाट्यमहोत्सव

# उबग आणणारे राजकारण

महाराष्ट्र राज्याच्या तेराव्या नाट्यमहोत्सवांतर्गत नागपूर केंद्रावरच्या प्रादेशिक स्पर्धा सोमवार दिनांक २६ नोव्हेंबर १९७३ पासून येथील विदर्भ साहित्य संघाच्या धनवटे रंग मंदिरात सुरू झाल्या असून त्या दिनांक २१ डिसेंबर १९७३ पर्यंत चालू रहाणार आहेत. यांत एकूण तेरा नाटके सादर होणार होती; पण पहिल्याच सत्रातील पाच नाटकांपैकी एक नाटक काही 'अपरिहार्य' कारणामुळे रद्द झाले. आता दिनांक ४ ते ७ डिसेंबर या सत्रात चार व दिनांक १८ ते २१ डिसेंबर या सत्रात चार अशी एकूण आठ नाटके सादर होतील.

स्पर्धेची सुरुवात ज्या संशयास्पद वातावरणात झाली आहे त्याबाबत प्रारंभी सांगतो. गेली बारा वर्षे नागपुरात या स्पर्धा होत आहेत. प्रारंभी तीनचार वर्षे नागपूरकर मोठ्या उत्सुकतेने या स्पर्धेकडे पहात असत, नाटकांना हजर रहात असत. पण नंतर मात्र उत्साह ओसरत चालला व गेल्या दोनचार वर्षांत तर वृत्तपत्रातून स्पर्धेतील नाटकांची समीक्षणे वाचून मगच नागपुरात नाट्यस्पर्धा सुरू झाल्याचे लक्षात येई. इतकी उदासिनता या स्पर्धेबाबत निर्माण झाली होती. आणि याला कारण म्हणजे स्पर्धेत चालणारे राजकारण व स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थामध्ये असलेला खिलाडूपणाचा अभाव! परीक्षक नेमण्यापासून या राजकारणाला सुरवात होत असे. आणि आपल्याला सोयीची तारीख कशी मिळेल येथपर्यंत हे राजकारण खेळले-जाई. त्यानंतर स्पर्धेत सादर होणाऱ्या नाटकातील कलावंतांना नाउमेद करण्यासाठीही जे प्रयत्न व्हावयाचे तेही सामान्य नाट्यरसिकांना पसंत पडत नसत. यात 'रंजन कला मंदिर'सारख्या नावाजलेल्या संस्थाही सहभागी होत असत याचे अतिशय दुःख त्या संस्थेविषयी आपुलकी बाळगणाऱ्या नाट्यरसिकांना होई. अशा या परिस्थितीत होणाऱ्या स्पर्धा म्हणजे केवळ देखावा आहे याची जाणीव १९६४ पासून हळूहळू नाट्यरसिकांना होऊ लागली आणि ते या स्पर्धेपासून पूर्णपणे दुरावले गेले.

पण यंदा मात्र या स्पर्धेबाबत एकदम उत्सुकता निर्माण झाली. अर्थात याचा अर्थ नाटचप्रयोगाला गर्दी होऊ लागली आहे असा मात्र नव्हे. आतापर्यंत या स्पर्धात जे राजकारण चालत असे ते गुपचूप चाले आणि स्पर्धा संपल्यावर व निर्णय लागल्यावर त्याची वाच्यता होई, आणि मग त्याबाबतच्या चर्चा आपापसात किंवा क्वचित् प्रसंगी वृत्त-पत्रातून होई. परंतु यंदा मात्र अघटीत असेच घडले.

अर्थात् याला प्रारंभ झाला 'रंजन कला मंदिरा'पासूनच ! स्पर्धेचा नियम आहे की, स्पर्धेत भाग घेण्यासाठी जेव्हा आवेदन करावयाचे तेव्हा त्याबरोबरच नाटकाचे हस्तलिखितही सादर करावयाचे. आणि ते जर नसेल तर संस्थेचा अर्ज निकालात काढला जातो. मला मुंबई येथील अगदी विश्वसनीय सूत्राकडून समजले की 'रंजन कला मंदिर'ने जेव्हा आवेदनपत्र सादर केले तेव्हा त्या सोबत नाटकाचे फक्त नाव होते. पण हस्तलिखीत नव्हते. याबाबत जेव्हा अधिक तपास केला तेव्हा 'वेदनेचा वेद झाला' हे नाटक श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्याकडून लिहूनही पूर्ण झाले नव्हते. आवेदन पत्र सादर केल्यावर काही दिवसांनी नाटकाचा पहिला अंक संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला. ज्यावेळी प्रादेशिक स्पर्धांचा संभाव्य कार्यक्रम जाहीर झाला तेव्हा नाटकाचा दुसरा अंक दिला गेला आणि शेवटचा अंक त्यानंतर अगदी अलिकडेच देण्यात आला. दिनांक ३० नोव्हेंबर हा रंजन कला मंदिरला दिलेला दिवस खास वशिला लावून यासाठी बदलण्यात आला आणि त्यांना दिनांक २० डिसेंबर ही तारीख दिली गेली. आणि ज्या ए. आय. आर. कला मंडळाला ही तारीख कळविण्यात आली होती, त्यांना ३० नोव्हेंबर ही तारीख दिली गेली. हा जो सर्व प्रकार झाला तो अर्थातच सर्वसामान्य नाटचरसिकांना आजिबात् माहीत नव्हता.

परंतु या गोष्टीचा परिस्फोट स्पर्धा सुरू झाल्यानंतर जेव्हा दिनांक ३० चा प्रयोग 'अपरिहार्य' कारणामुळे रद्द झाल्याचे जाहीर झाले तेव्हा झाला. अर्थात तो देखील झाला केवळ परीक्षकांच्या नेमणुकीबबत झालेल्या गोंधळाचा आरडाओरडा झाल्यावर. स्पर्धा सुरू व्हायच्या केवळ बारा तास अगोदर नियुक्त करण्यात आलेल्या एका परीक्षकाला काढून त्याठिकाणी दुसऱ्या परीक्षकाची नेमणूक झाली. त्यामुळे स्पर्धेत भाग घेणाऱ्या नाटच-संस्थांमध्ये साहजिकच खळबळ माजली आणि त्याबबत संतापाची लाट उठली. या परीक्षकांच्या नेमणुकीतील गोंधळाला 'नागपूर टाईम्स' आणि 'हितवाद' या इंग्रजी दैनिकातून काही वाचकांनी पत्राद्वारे वाचा फोडली. पण बुधवार दिनांक २८ रोजी दैनिक 'लोकमत'ने या गोंधळाचे संपूर्ण वृत्त अगदी पहिल्याच पानावर प्रसिद्ध करून हे सर्व प्रकरण तमाम नागपुरातच नव्हे तर संपूर्ण विदर्भात जनतेच्या न्यायालयात सादर केले. त्यापाठोपाठ दैनिक 'तरुण

भारत 'ने आपल्या दि. ३० नोव्हेंबरच्या अंकात या प्रकरणी अग्रलेख लिहून वातावरण दूषित करणाऱ्या या नाटच-स्पर्धा बंदच कराव्यात असे अगदी निर्वाणीचे प्रतिपादन केले.

हे सर्व प्रकरण असे घडून गेले. प्रारंभी नागपूरच्या स्पर्धा दिनांक २२ नोव्हेंबर पासून सुरू होणार असल्याचे शासनातर्फे प्रसिद्ध झाले होते. पण २० तारीख उजाडली तरी कोणतीच हाल-चाल होत असल्याचे न दिसल्याने स्पर्धा होतात की नाही अशी शंका काहींच्या मनात निर्माण झाली. पण तत्पूर्वीच परीक्षकांची नेमणूक झाल्याचे मला समजले होते. त्यामुळे स्पर्धा होणार याची खात्री होती. परीक्षक म्हणून नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागा-तील प्राध्यापक आणि सुप्रसिद्ध टीका-कार व समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी, धनवटे नॅशनल कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक आणि नाटच विषयाचे अभ्यासक प्रा. रं. पां. पाजणकर व अमरावतीचे सुप्रसिद्ध लेखक श्री. मधुकर केचे या तिघांची नेमणूक झाली होती. पण शनिवार दि. २४ रोजी रात्री मला समजले की, डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या जागी दैनिक 'तरुण भारत'मधील एक उपसंपादक व शहर वार्ताहर श्री. ज्ञानेश्वर वाघमारे यांची परीक्षक म्हणून नेमणूक झाली. याबाबत मी जेव्हा त्यांना विचारले, तेव्हा त्यांनी 'मला अजून नेमणुकीचे पत्र मिळालेले नाही' असे सांगितले. त्यांना सदर पत्र सोमवार दिनांक २६ रोजी सकाळी मिळाले असल्याचे नंतर मला समजले. अशा परिस्थितीत श्री. वाघमारे यांच्या नेमणुकीचे वृत्त दोन दिवस आधी सर्व शहरात कसे प्रसृत झाले ?

डॉ. द. भि. कुलकर्णी यांची नेमणूक नाटचस्पर्धेत भाग घेणाऱ्या काही संस्थांना पसंत नव्हती. आणि याचे कारण व्यक्तिगत द्वेष ! डॉ. कुलकर्णी यांची विद्वता विद्यापीठातील आणि शहरातील त्यांच्या काही समव्यव-सायिकांच्या डोळचात खुपत असून त्यांच्या विरुद्ध सतत काही ना काही कट-कारस्थाने शैक्षणिक क्षेत्रात चालू असतात. त्यापायी डॉक्टरसाहेबांना विद्यापीठाने दीड वर्ष निलंबितही केले होते. त्यानंतर त्यांना पुन: कामावर घेण्यात आले ही गोष्ट त्यांच्या हित-शत्रूंना मुळीच पसंत नव्हती आणि ते संधीची वाट पहात होते. ती त्यांना आता मिळाली व त्याचा फायदा त्यांनी त्वरित घेतली घेतला. स्पर्धेत भाग घेतलेल्या कलासंपदा, नागपूर अॅकॅदमी, रंगरेखा, बंगाली अॅसोसिएशन, सुरूची निकेतन, धनवटे नॅशनल कॉलेजची नाटच समिती या संस्थांच्या प्रति-निधींचे एक शिष्टमंडळ समाज कल्याण खात्याच्या मंत्री सौ. प्रतिभा पाटील यांना भेटले आणि त्यांनी डॉ. द. भि. कुलकर्णी हे 'रंजक कला मंदिर'चे अध्यक्ष असल्याने त्यांच्याकडून इतर नाटचसंस्थांना योग्य न्याय मिळणार नाही, सबब त्यांना परीक्षक म्हणून नियुक्त करू नये अशी त्यांना विनंती

केली. सौ. प्रतिभाताईंनी समाज-कल्याण विभागाचे येथील अधिकारी श्री. काकडे यांना याबाबत विचारले असता त्यांचा आक्षेप योग्य आहे, असे सांगितल्याचे समजते. साहजिकच नंतर सौ. पाटील यानी शिष्टमंडळाला कुलकर्णींच्या ऐवजी कोणते नाव सुच-विता असे विचारताच, श्री. ज्ञानेश्वर वाघमारे यांचे नाव सुचविले गेले. आणि सौ. प्रतिभा पाटील यांनी लगेच मुंबईला श्री. हुमणे यांच्याशी संपर्क साधून त्या नावाला संमती मिळविली.

हे सर्व घडत होते त्याची कल्पना इतर संस्थांना नव्हती. पण योगायोग असा की, स्वतःच्या काही वैयक्तिक कामासाठी सचिवालयात गेलेल्या एका व्यक्तीचे—ही व्यक्ती उपरोक्त संस्थां-व्यतिरिक्त स्पर्धेत भाग घेतलेल्या संस्थेची सदस्य होती—लक्ष या शिष्ट-मंडळाकडे गेले. त्यांनी जेव्हा चौकशी केली तेव्हा हा सर्व प्रकार उघडकीस आला. आणि मग त्याची चर्चा इतरत्र होऊन त्याला सार्वजनिक स्वरूप आले. लगेच उरलेल्या संस्थांतर्फे काही लोक सौ. पाटील यांना भेटावयास गेले. आणि त्यांनी डॉ. कुलकर्णी हे 'रंजन कला मंदिर'चे अध्यक्ष तर सोडाच पण साधे सदस्यही नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. पण तोपर्यंत श्री. वाघमारे यांची नियुक्ती झाल्याचे पत्र कार्यालयातून रवाना झाले होते. सौ. पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना डॉ. कुलकर्णी हे रंजनचे सदस्य आहेत किंवा नाहीत याबाबतची चौकशी कर-ण्याचे आदेश दिल्याचे समजले पण या घटकेपर्यंत तरी रंजन कला मंदिराच्या कार्यालयात कोणताही अधिकारी चौकशीला आला नसल्याचे समजले.

दरम्यान नाट्यस्पर्धा सुरू झाल्या आहेत. आणि चार नाटके सादर झाली असून त्यापैकी तिघांनी परीक्षकांबाबतचा आपला लेखी निषेध नोंदवून आपापले प्रयोग सादर केले आहेत. विधान-सभेतही अल्पमुदतीचा प्रश्न आमदार श्री. धैर्यशीलराव वाघ यांनी पाठविला आहे. या प्रकरणी न्यायालयात जाऊन नाट्यमहोत्सव स्थगित करण्याचीही खटपटीत काही लोक असून आमदार श्री. धैर्यशीलराव वाघ यातून काही सन्मान्य तडजोड होऊ शकते की काय हे पहात आहेत. एकूण एवढे मात्र खरे, की येथील स्पर्धा संशयित आणि कलुषित वातावरणात होत आहेत.

**शनवारवाड्यातील शमादान**

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्याबाबत चुकीच्या माहितीच्या आधाराने, किंबहुना आयत्यावेळी जे सुचले ते (प्रथम जे निवेदन सादर करण्यात यावयाचे होते त्यात निराळेच कारण होते. ते नंतर बदलले) कारण देऊन जो आक्षेप घेतला, तसाच आक्षेप इतर संस्थानी प्रा. रु. पां. पाजणकर यांच्याबाबतही घेतल्याचे समजते. प्रा. पाजणकर हे धनवटे नॅशनल कॉलेजचे प्राध्यापक असून त्या कॉलेजातील नाटयसमितीचे एक नाटक या स्पर्धेत आहे. शिवाय त्याच कॉलेजातील त्यांचे समव्यवसायी प्रा. मनोहर रोकडे यांची 'अग्निकथा' व 'राजरक्त' ही दोन नाटकेही याच स्पर्धेत सादर होणार असल्याने प्रा. पाजणकर यांच्याकडून त्या नाटकांबाबत पक्षपात होणारच नाही याची शाश्वती कोण देणार, असा प्रश्न 'नवरंग', 'ए. आय. आर. कला मंडळ' 'ए. जी. रिक्रिएशन क्लब' आदि नाटय संस्थांनी विचारला आहे. तो अयोग्य कसा म्हणता येईल? हा मजकूर लिहीत असतानाच मला समजले की, डॉ. द. भि. च्या विरुद्ध ज्यांनी तक्रार केली त्यात 'रंगरेखा' व 'बंगाली ॲसोसिएशन' या संस्थातर्फे ज्यांनी सह्या केल्या त्यांच्याबद्दल सदर संस्थातील इतर सदस्यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. सारांश हा सर्वच प्रकार उबग आणणारा आहे.

स्पर्धेतील नाटयप्रयोगांचे समीक्षण पुढील अंकी देईन!

—वसंत सदाशिव नानल

## भेसळ, विषबाधा

पृष्ठ २ वरून

ह्या पर्यायी पदार्थांचा व्यापार होत होता, असल्या चमत्कारिक ठिकाणाहून!!

त्या ठिकाणी सॅकरिनचे उत्पादन होते असे मला सांगितले गेले. पण मला ते तितकेसे पटले नाही. दहा बाय दहाच्या शेडमध्ये सॅकरीनचे उत्पादन शक्यच नाही. पण तिथे जे चालले होते ते 'रीपॅकिंग' होते एवढे मात्र निश्चित. मोठमोठया कंपन्यांच्या नावाचे ड्रम्स तिथे पडलेले होते. बॅगा होत्या. आणखीही बरेच काही पदार्थ निरनिराळया बॅगातून भरलेले होते. बहुधा: मिश्रणासाठीच असावेत. भरलेल्या सॅकरीनच्या बॅगा, ड्रम्स झपाटयाने पुन: 'सील' होत होते. टेंपोकडे रवाना होत होते...

निरनिराळी औषधे, पेये व इतर कित्येक व्यवसायामध्ये सॅकरीनला अनन्यसाधारण महत्त्व आहे. साखरेच्या शंभर पट अधिक गोडी सॅकरीनला असते आणि म्हणूनच फार लहान प्रमाणावर सॅकरीन अशा वस्तूमध्ये वापरावे लागते. साखरेच्या अलीकडच्या टंचाईपासून, सॅकरीनचा उपयोग मिठायांच्या दुकानातूनही होऊ लागला आहे. हॉटेले, खानावळी वगैरेंतूनही सॅकरीन खपू लागले आहे. साहजिकच, कुठल्याही तऱ्हेचे सॅकरीन आज हव्या त्या किमतीला खपते आहे—अगदी किलोला शंभर रुपयांच्या किमतीत-

सुद्धा ! त्यातच, सॅकरीनसाठी आवश्यक असणाऱ्या काही अन्य रसायनांच्या उत्पादनात, अलीकडील औद्योगिक अशांततेमुळे खंड पडलेला असल्याने, सॅकरीनचाही तुटवडा भासू लागला आहे ! धारावीतल्या त्या छोटचा गाळ्यांतने, भेसळ स्वरूपातले सॅकरीन बाहेर पडत असताना, सॅकरीनच्या व्यवहारातली आजची वस्तुस्थिती सहजच मनापुढे तरळली...

'...इथने बाहेर पडते ते पन्नास पंचावनच्या भावातले सॅकरीन. गिऱ्हाईकही ह्या सॅकरीनला फार लांब नाही. इथे आजूबाजूलाच आहे...' इती माझा मित्र.

तिथने आम्ही बाजूच्या चाळीतल्या गाळ्यात शिरलो. गाळ्याच्या दर्शनी भागात गोल्ट-स्पॉट, रिमझिम, कोका-कोला, सोसयो पेयांच्या असंख्य बाटल्या पडलेल्या होत्या. काही रिकाम्या, काही भरलेल्या. आतल्या भागात म्हणे ती पेये बनवली जातात. तो भाग अर्थातच, आम्हाला बघायला मिळाला नाही. पण तिथे येणारे सॅकरीन, आजूबाजूचा परिसर, चाललेली लोकांची गडबड या साऱ्यावरून तिथे बनणाऱ्या पेयांचा दर्जा सहजी उमगू शकत होता...

कुठनेही दमून भागून किंवा उन्हातून चालून गेल्यावर मी बहुधा: एखाद्या थंड पेयाची बाटली रिचवतो. धारावीतला तो प्रकार बघताना मला माझी ही सवय आठवली न मी दचकलोच. मी आजपर्यंत रिचवलेल्या प्रत्येक बाटलीतून, खरोखर मूळ कंपनीचेच पेय पोटात गेले असेल असे म्हणणे माझ्या जिवावर आले. कदाचित, असल्या बनावट पेयातून काही अपायकारक पदार्थही पोटात गेले असण्याची शक्यता नाकारता येण्याजोगी नव्हती....

धारावीतून पुढे हिंडताना अनेक चमत्कारिक प्रकार मला पाह्यला मिळाले. बेकऱ्या दिसल्या, हलवायांच्या कढया दिसल्या. जसजसा मी पुढे जाऊ लागलो तसतसे मनात येऊ लागले, आपण बाहेर खातो, विकत घेतो त्यातला कुठला तरी पदार्थ बिन भेसळीचा असेल का ? बिगर परवान्यांच्या छोटचा छोटचा व्यवसायातून धंदा चालतो तो भेसळीवरच !

धारावी सोडता सोडता त्यागराज मणी थोडा विश्वासाचा वाटू लागला. त्याला सहज प्रश्न केला, 'ह्या उद्योगांविरुद्ध कुणीच तक्रारी करीत नाही का ? पोलीस, नगरपालिकेचे अधिकारी कुणीच ह्या प्रश्नांवर काहीच कारवाई करीत नाही का ?'

त्यागराज मणीचं उत्तर ऐकण्यासारखे आहे. तो म्हणाला, 'आधी सहसा तक्रार होतच नाही. त्यातून कधी पोलीस पार्टी किंवा म्युनिसिपल पार्टी आलीच तर ती ह्या गाळ्यापर्यंत पोचेपर्यंत त्या गाळ्यांचे स्वरूप बदललेले असते. तुम्ही ड्रिंक्स बनवणारा गाळा बघितला. अधिकारी म्हणून तिथे जा, तिथं दर्शनी भागात एकही बाटली दिसणार नाही. एक म्हातारा खोकत किंवा मिश्री लावीत बसलेला फक्त दिसेल ! हाच प्रकार थोड्या फार

फरकाने सर्वत्र !'

धारावी सोडताना मन बरेच बिथरले होते. थोडेसे धास्तावलेलेही ! घरी पोहोचेपर्यंत चहा, ड्रिंक वगैरे तर काही घेतलेलेच नाही, पण साधी सिगरेटदेखील शिलगावली नाही...

नेहमीच्या गडबडीत हे धारावी-दर्शन मी दोन-चार दिवसात विसरूनही गेलो असतो. पण ह्या प्रसंगानंतर अवघ्या चारच दिवसात, माहीम येथील 'वांजे-वाडी' ह्या बहुसंख्य मुसलमान वस्तीत विषबाधेची लागण सव्वादोनशे लोकांना झाल्याची खळबळजनक बातमी बाहेर आली. ह्या सव्वादोनशात शंभरावर मुले होती. त्या आधी एक-दोन दिवसच वरसोवा इथे, 'बाजरी-मासळी' जेवणातून विषबाधा होऊन एक मुलगी दगावल्याची बातमी आली होती.

आणि मग पाठोपाठ बातम्याच येत राहिल्या. जोगेश्वरी, बोरीवली, आग्रीपाडा, खार...

.. पुणे...ससूनमध्ये खास उपचार पथक.

...अनाथाश्रमात चाळीसना विषबाधा.

...जितूर इथे दोन मृत्यू.

...९ जिल्ह्यांतून शेकडो लोकांना ज्वारीतून विषबाधा.. ज्वारीवर अरगॉट रोग वगैरे वगैरे.

विधानसभा, महापालिका ठिकठिकाणाहून ह्या व अशा प्रकरणांवर चर्चा सुरू झाल्या. बाजरीची विक्री राज्यभर स्थगित झाली. विरोधी पक्षियांनी सरकारवर प्रखर टीकास्त्र सोडलं. परिस्थितीच अशी होती की, सरकारला जबाबदारी टाळता आली नाही. डॉ. रफिक झकेरियांनी विधानसभेत तसे जाहीरही करून टाकले... आज ठिकठिकाणचे बाजरीचे साठे गोठवले गेले आहेत. त्यांची रासायनिक तपासणी चालू आहे. काही दिवसात, मिठाच्या पाण्याने साफ करून ही बाजरी पुनः खुलीही होईल. एकाएकी सुरू झालेल्या ह्या मालिकेमुळे लोक हादरले. आज ह्या बातम्या कमी होऊ लागल्या आहेत. लोक नित्याच्या व्यवसायाकडे वळू लागले आहेत. आणि कदाचित पुनः तसेच मोठे प्रकरण घडले नाही तर ह्या विषबाधाही लोक विसरून जातील. आज घेतलेल्या बाजरीच्या नमुन्यांच्या निकालांनाही कुणी फारसे महत्त्व देणार नाही. शासन, महापालिका, पोलीस, त्यांचे कार्यकारी अधिकारी साऱ्यांचे कारभार नेहमीच्या ढांच्यात तसेच पुढे सुरू राहतील. भेसळही आहे तशीच, कदाचित अधिक मोठ्या प्रमाणातही, पुढे सुरूच राहील.

पण धारावीला मी जे पाहिले, नंतरच्या बातम्यांनी भेसळीच्या भीषणतेचे जे स्वरूप मला दिसले, त्यामुळे तरी निदान ह्या भेसळीच्या प्रकरणात थोडे खोलवर डोकवायचे मी ठरवले आणि त्यातूनच छोट्या छोट्या औद्योगिक 'चाळी'तल्या बेकऱ्या, 'टॉफी' उत्पादने, उपाहारगृहे, तेलांचे घाणे वगैरेंना मी भेटी दिल्या. अ पासून ज्ञ पर्यंत सर्व वस्तू जिथे बनतात त्या उल्हासनगरातून हिंडून आलो. खुद्द

मुंबईतल्या बड्या बड्या दुकानातून डोकावलो. ह्या सर्व उठाठेवीतून, एक गोष्ट पुनः पुनः मनावर बिंबत गेली. आज भेसळीशिवाय, बनवाबनवीशिवाय कुठलीही वस्तू बाजारात मिळतच नाही असे माझे ठाम मत बनले आहे!

गव्हा-तांदुळात किंवा अन्य कुठल्याही धान्यात खडे, कांचांचे तुकडे मिळतात. ते अपघाताने नव्हेत. तसे ते पद्धतशीरपणे मिसळले जातात. खायची तेले, अन्ने अत्यंत हलक्या दर्जाच्या तेलांनी स्वस्त करून विकली जातात हो वस्तुस्थिती आहे. डालडा, 'शुद्धतुपा'ची परिस्थिती वेगळी नाही. मैदा, आटा ह्यातल्या भेसळी नव्या नाहीत. आणि हे सारं कोपऱ्यावरचा वाणी करतो असंही नाही. त्यालाच माल तसा मिळतो. संपूर्ण महाराष्ट्रभर रेशनद्वारा पुरवल्या जाणाऱ्या गव्हा-तांदळात भेसळ असते. ती काय त्यामागे फार मोठी यंत्रणा असल्याशिवाय? दुधात पाणी ही भेसळ तर नेहमीचीच. पण, सरकारी दूध डेअरीतर्फे के. ई. एम्. हॉस्पिटलला पुरवण्यात येणारे दूध नेहमी कमी प्रतीचं असतं अशी तक्रार मुंबईचे महापौर श्री. सुधीर जोशी करतात तेव्हा ही भेसळ रोखायची कशी असा प्रश्न पडतो. परवा विधानसभेत श्रीमती मृणाल गोरे ह्यांनी सरकारी डेअरीतून होणाऱ्या तुपाच्या व दुधाच्या पुरवठ्याबाबतही अशीच गंभीर तक्रार पुराव्यानिशी दाखल केली. अगदी अलिकडेच लोकसभेत देण्यात आलेल्या एका लेखी उत्तरात केंद्र शासनाने असे मान्य केले. की मसाले, गव्हाचे पदार्थ, मीठा माल, चहा, साखर अशा काही पदार्थांच्या नमुन्यांची १९७२ पूर्वी तपासणी करण्यात आली असता त्यातले ३८.५ टक्के पदार्थ हिणकस दर्जाचे असल्याचे आढळून आले. १९७२।७३ मधल्या भीषण दुष्काळानंतरच्या चणचणीत हे प्रमाण ह्याहुन अधिक, खूपच अधिक झालं आहे हे अनेक तज्ञांनी मान्य केलं आहे.

भेसळीचं स्वरूप हे असे भयानक आहे. महापौर श्री. सुधीर जोशी ह्यांच्याशी बोलताना त्यांनी भेसळीच्या ह्या भयानक स्वरूपाची पूर्ण जाण दाखवली. एकंदर प्रश्नावर बोलताना ते म्हणाले, "... भेसळ हे सुद्धा शास्त्र आहे, त्याच्या मुळाशी मोठमोठी माणसं बसली आहेत. सरकारलाच तिथपर्यंत पोचणं शक्य आहे. सरकारला ह्या भेसळीबाबत कडक धोरण स्वीकारायला लावणे मात्र विरोधी पक्षीयांचं काम आहे...ठरवलेल्या दर्जाचा माल आज मिळणं आणि तो सामान्य जनतेला परवडणं हे कठीण आहे. असे माझे मत आहे. तो तसा परवडत नाही, पण गिऱ्हाईकांनी घेतला तर पाहिजे, कारण त्याशिवाय विकणाऱ्याचे चालूच शकत नाही. साहजिकच विकणारा, जनतेला परवडेल इतपत किमती कमी करण्यासाठी मालाचा दर्जा कमी करतो. भेसळीचे हे साधे सरळ तार्किक अर्थशास्त्र आहे. आणि ही भेसळ ओळखू न येईल अशा पद्धतीने करणे किंवा किंमत कमी करण्यासाठी मिसळायच्या पदार्थांचे

परिणाम तावडतोब दृग्गोचर होणार नाहीत हे बघणे हे भेसळीचे शास्त्र आहे. हे प्रकार घडतात अतिशय पद्धतशीरपणे त्यामुळे अशा भेसळी सहसा ओळखू येऊ शकत नाहीत. अर्थातच, त्याविरुद्धची कारवाई लांबच राहते... माहिमच्या किंवा सध्या सर्वत्र सुरू असलेल्या बाजरी प्रकरणात निदान विषबाधा झाल्याचे तावडतोब लक्षात येऊन काही उपचार तरी होतात. वर सांगितलेल्या पद्धतशीर भेसळीत मात्र असेही उपचार अशक्य होतात. तो प्रकार स्लो पॉयझनिंगचा असतो. म्हणूनच अधिक धोकादायक असतो...."

"ह्याच संबंधात आणखी एक प्रश्न असा उपस्थित होतो की, स्टेटला प्रॉसिक्यूट कुणी करायचे ?" श्री. सुधीर जोशी पुढे म्हणाले– सरकारी दुधाचा स्निग्धांश ठरवलेल्या स्निग्धांशापेक्षा कमी असतो. सरकारी धान्य दुकानातून मिळणाऱ्या धांन्यात फार मोठ्या प्रमाणावर अन्य वस्तूंची (Foreign matter) भेसळ असते. अरगॉट मिश्रित बाजरीची माहिती सरकारला ऑक्टोबरपासून होती. त्याच्या विषारी परिणामांची सरकारनेच जनतेला कल्पना पत्रक काढून दिली होती. तरीही सरकारी दुकानातूनच ही बाजरी विकली गेली. विषबाधा झाली. आता प्रश्न असा की ह्या संबंनात अन्य लोक काहीच करू शकत नाहीत. ह्यात खरे तर सरकारविरुद्धच कारवाई व्हायला हवी. पण कोण करणार ? करता येईल का ?..."

"मागच्या अखिल भारतीय महापौर परिषदेत हा धान्य भेसळीचा प्रश्न निघाला होता. ह्याहीवेळी पुन: निघेल. केंद्र शासन म्हणते, राज्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी. ह्याची शक्यता पहायला हवी.

'...ह्या एकूण भेसळीविरुद्ध प्रतिबंधक उपाय योजणे कठीण जाते हेही खरच. प्रत्येक दुकानातून असे साठे तपासणे व्यावहारिक दृष्टया शक्य होत नाही. गिऱ्हाइकांच्याही तक्रारी सहसा नसतातच. भेसळ ज्या पद्धतीने होते त्यामुळे त्यांच्या ते लक्षातच येऊ शकत नाही...आमची क्वॅड्स अॅटरँडम चेक करतात. पण त्यांचा तितकासा उपयोग होत नाही.

'...तसेच आज हेही मान्य केले पाहिजे की प्रमाणित दर्जाचा माल कुठलाच नसतो. बहुधा sub-standard च असतो. मग निदान standard, substandard ह्या व्याख्या तरी निश्चित करून त्यानुसार किंमती आकारल्या जाव्यात.

'...एकूण प्रकरणात शासनाची जबाबदारी मोठी आहे हे मान्य केले पाहिजे. आणि त्याच पातळीवर भेसळीवर मोठ्या प्रमाणात कडक निर्बंध घातले पाहिजेत ह्यासाठी मोठी चळवळ आवश्यक आहे...'

अशी चळवळ आज अस्तित्त्वात आहे का ? विषबाधेची लागोपाठ प्रकरणे घडल्यावर विरोधी पक्षीयांनी आज विधानसभेत शासनाला धारेवर धरले आहे. पण एरवी विरोधी पक्ष काय

करीत अससात ? पगारवाढी, राजकीय चळवळी, भाषिक-धार्मिक वाद ह्यावर मोठाली आंदोलने विरोधी पक्षीय उभारतात. परंतु अन्नधान्यातल्या भेसळीतून प्रत्यही मोठा धोका सर्वच जनतेला असूनही त्याविरूद्ध मात्र मोठा आवाज सहसा ऐकू येत नाही. त्याविरुद्धचे आंदोलन तर दूरच ! ह्या आंदोलनाचे स्वरूप काहीसे जनशिक्षणाचे आहे. साहजिकच प्रसिद्धीचा झगमगाट तिथे नाही. तेव्हा राजकीय पक्षांना ह्या चळवळीकडे लक्ष पुरविणे फायद्याचे वाटत नाही. दळवी बिल्डिंग (कम्युनिस्ट), कथ्थकभुवन (जनसंघ), काँग्रेसवाले, समाजवादी वगैरे अनेक ठिकाणी मी चावपलं. उघड नाही. पण साधारणत: अशा आंदोलनात कुणाला फारसा रस दिसला नाही. सरकारवर जबाबदारी टाकूनच मोकळे व्हायचे प्रकार सर्वत्र दिसला.

काही सामाजिक संस्था अशा दिशांनी प्रयत्न करीत आहेत. पण त्यांना मिळणारा प्रतिसाद कमी आहे. त्यांचे मनुष्य बळ तोकडे आहे. अशाच एका संस्थेच्या श्रीमती लीला जोग ह्यांनी अशा प्रकरणात जनतेची साथ मिळत नसल्याची जाहीर तक्रार अगदी अलिकडेच केली आहे. 'लोक, धान्य भेसळी खपवून घेतात. आवाहन करूनही त्यांविषयी तक्रारी आणीतच नाहीत.' असा त्यांचा आरोप आहे. शासनाच्या हलगर्जीपणावरही त्यांनी कडक टीका केली आहे.

श्री. बाबा नाईक हे एक सामाजिक कार्यकर्ते. त्यांच्या मते, 'वार्डवार दक्षता समित्या नेमल्या गेल्या पाहिजेत. त्यांच्यातर्फे ठिकठिकाणचे अन्नधान्यांचे साठे तपासून घेतले पाहिजेत. भेसळीच्या सर्वसाधारण प्रकारांची माहिती ह्या दक्षता समितीच्या प्रतिनिधीमार्फत जनतेला करून दिली पाहिजे. भेसळी ओळखायला त्यांना शिकविले गेले पाहिजे, फूड अॅण्ड ड्रग कंट्रोल, आरोग्य खाते, शास्त्रज्ञ, टाटा इन्स्टिटयूट वगैरेंचे साह्य अशा प्रशिक्षणात शासनाने ह्या समित्यांना मिळवून दिले पाहिजे. आणि मुख्य म्हणजे, ह्या समित्यांनी उघडकीस आणलेल्या प्रकरणात कडक कारवाई करण्याची हमी शासनाने दिली पाहिजे. भेसळी जनतेच्या जीवनाशी खेळत असतात हे लक्षात घेऊन अशा तऱ्हेच्या योजना कायम स्वरूपात राबवणे आवश्यक ठरते...'

भेसळी इतक्याच प्रमाणात, विषबाधेला पूरक ठरते ते हवा दूषितीकरण. दूषित पाणी वगैरे मोठमोठया अवजड उद्योगधंद्यातून नद्या, नाले, समुद्र ह्यातून सोडल्या जाणाऱ्या पाण्यातून जलचरावर परिणाम होतात. हजारो-लाखो मेलेले मासे किनाऱ्यावर इतस्तत: विखुरलेले दिसल्याच्या बातम्या आपल्याकडे आता नवीन नाहीत. अशाच मासळीच्या सेवनातून विषबाधेचे प्रकार घडून यायचे प्रमाणही वाढलेले आहे. मुंबईत अलिकडे घडलेल्या बऱ्याच विषबाधा प्रकरणात, 'फीश करी' मूळ असल्याचे दिसून आले आहे. ह्या पाणी दूषितीकरणा-

विरूद्ध एक बीलही सध्या राज्य-सभा, लोक सभेतून चर्चिले जात आहे.

वायु दूषितीकरणाचे परिणामही असेच दूरगामी ठरताहेत. मुंबईतल्या चेंबूर परिसरात ह्या दूषितीकरणाचे परिणाम प्रकर्षाने जाणवू लागले आहेत. चेंबूरचे कॉंग्रेस आमदार श्री. वि. कृ. टेंबे ह्यांनी ह्याविरूद्ध मध्यंतरी आंदोलनही संघटित केले आहे. नव्या मुंबईतल्या असल्या दूषितीकरणासंबंधी तज्ज्ञांनी गंभीर इशारे दिलेले आहेत. नवनगरीचे विरोधक ह्या इशाऱ्यांना मधून मधून तोंड फोडीतही असतात.

मानवी जीवनाला गंभीर धोका निर्माण करणाऱ्या भेसळीबाबत मात्र असे आंदोलन छोट्या प्रमाणात का होईना संघटित होत नाही. आजच्या युगात slow paisoning ला मदत करणारे हे तीनही पूरक घटक आहेत. पण भेसळीविरूद्ध गंभीर उपाय योजल्याचे आढळून येत नाही. जनतेच्याही ती इतकी पचनी पडली आहे की, दैनंदिन जीवनात प्रत्यही भेसळयुक्त पदार्थच माणसाला खावे लागत आहेत ही जाणीवही लोकात फारशी दिसत नाही. ह्या तिन्ही घटकाविरूद्ध वास्तविक संघटित आंदोलन उभे राहायला हवे. तिघांचा संघटित प्रतिकार झाला पाहिजे.

भेसळीतून होणाऱ्या विषबाधेच्या प्रकरणात आणखी एक चमत्कारिक प्रकार मला महापालिकेत ऐकायला मिळाला. अनेक विषबाधा प्रकरणातल्या प्रकरणाशी संबंधित अन्नधान्य तपासणीच्या रिपोर्टातून ती ती अन्नधान्य विषबाधेची मूळ कारणे नाहीत असे आढळून आले आहे. तिथले डॉ. दलाल ह्या संबंधात म्हणाले, 'विषबाधेची प्रकरणे उद्‌भवल्या पासून, त्या संबंधातली सँपल्स घेईपर्यंत बराच वेळ निघून गेला असतो. विषबाधा झाल्यावर बऱ्याच वेळाने पोलिसात तक्रार जाते, व नंतर आम्हाला हे प्रकार कळतात. साहजिकच आम्हाला तपासणीसाठी मिळणारे नमुने आणि मुळात सेवन केले गेलेले पदार्थ ह्यात फरक पडण्याची शक्यता असते. वांजेवाडी, माहीम प्रकरणा संबंधीचाच रिपोर्ट उदाहरणार्थ घ्या. तिथला आटा, मैदा, अन्न पदार्थ ह्यात काही देखील आक्षेपार्ह आढळले नाही. तेलाची आम्लता थोडी (३.४% वरून ७½% पर्यंत) वाढलेली आढळली. परंतु ह्या आम्लतेमुळे एकाएकी दोनशे बारा जणांना विषबाधा होणार नाही. म्हणजे, मुळात विषबाधा दुसऱ्याच कशामुळे तरी झाली असावी.

अनेक ठिकाणी माशांच्या करीतून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येतो. अशा अनेक प्रकरणातून, मासे आदल्या दिवशी कोळ्याकडून घेऊन दुसऱ्या दिवशी वापरात आणल्याचे आढळून आले आहे. आता ज्या पद्धतीने मासे ठेवले असतील त्यावर देखील त्या माशांची 'खाद्य' म्हणून उपयुक्तता कमी होण्याची शक्यता आहे. जे माशांच्या बाबतीत, तेच अन्नधान्य डाळीबाबत... विषबाधेच्या तक्रारी साधारणतः खालच्या वर्गांच्या वस्त्यातून

येतात. तिथली अस्वच्छताही काही प्रमाणात ह्या विषबाधेला कारणीभूत ठरू शकते....'

डॉ. परुळेकरांनी सांगितले, '...तरीही आमची व्हिजिलन्स स्क्वॉड्स काम करीत असतात. अचानक धाडी, नमुने मिळविणे चालू असते. आज मुंबईतल्या सर्व बेकऱ्या, उपाहारगृहे ह्यातून विविध नमुने मिळवून त्यांची तपासणी चालू आहे.. जनतेने त्यांना ज्ञात असलेल्या गैरप्रकाराबाबतच्या तक्रारी आणाव्यात. आम्ही त्यावर अवश्य कारवाया करू....'

डॉ. दलाल ह्या प्रकारांच्या बाबतीत आणखी खोलवर गेले. महापौर सुधीर जोशांप्रमाणेच, सर्व साठे आधी तपासून घेणे, भेसळी उघडकीस आणणे व्यवहारात शक्य नाही असेही त्यांनी सांगितले. '...आमच्यावर आणखी एक बंधन असे असते की आमच्याकडे कारवाई करण्यासाठी तक्रार येणे आवश्यक असते. कित्येकदा हे तक्रारदार ऐनवेळी फिरतात, आणि कारवाई होऊच शकत नाही...'

ह्या सर्व प्रकारामध्ये खोलखोल जाऊ लागलो तसतसे भेसळीचे असंख्य प्रकार कानावर येऊ लागले.. भिक्षेपोटी मिळणाऱ्या पोळ्या, भाकऱ्या मुंबईतल्या फुटपाथवरून वाळवण्याचा प्रकार नेहमी दृष्टीसमोर येतो. ह्या वाळलेल्या पोळ्या, भाकऱ्यांचे पीठ होऊन ते पीठ उल्हासनगरला जाते आणि पाव, बिस्किटे ह्यांच्या स्वरूपात ते पुनः गिऱ्हाईकाकडे येते... सफरचंदांना गोडी यावी म्हणून सॅकरीनची इंजेक्शन्स दिली जातात म्हणे... आट्यात पद्धतशीरपणे राख मिसळली जाते आणि त्यामुळे दूधवाल्या भैय्याकडच्या राखेला फार मोठे गिऱ्हाईक हल्ली असते म्हणे...अन्नधान्यातून इतर पदार्थ मिसळण्याचा धंदा पद्धतशीरपणे, राजरोसपणे चालू असतो... दादरलाच एका ठिकाणी सिमेंटमध्ये दगडाची भुकटी मिसळून विकण्याचा कारखाना आहे...सायनला मोठ्या प्रमाणावर पेट्रोलमध्ये रॉकेल मिसळले जाते.. भायखळ्याला खायच्या तेलामध्ये कारखान्यातून वापरली जाणारी निकृष्ट प्रतीची तेले मिसळण्याचा उद्योग चालू असतो...बेकऱ्यातून पूर्वी पाव भट्टीतून अलगद बाहेर येण्यासाठी गोड्या किंवा खोबरेल तेलाचा वापर करीत. हल्ली खाटीकखान्यातून मिळणाऱ्या स्वस्त चरबीचा उपयोग ह्या कामासाठी केला जातो...तुरीच्या डाळीला पिवळाधमक रंग येण्यासाठी जो रंग लावला जातो तो आरोग्याला हानिकारक असतो... पानपट्ट्या, बर्फी ह्यावर 'चांदी' म्हणून चक्क अल्युमिनियचा पत्रा लावला जातो .. हलक्या प्रतीच्या गव्हाचे, धान्याचे बाह्यरंग बदलण्यासाठी त्यावर रासायनिक प्रक्रीया केली जाते. जादा भावात मिळणारा असा हा 'उच्च' प्रतीचा माल मुळात शरीरावर अपायकारक परिणाम करणारा असतो... अक्षरशः घाणीतून, वापरून झालेला चहाचा चोथा बाहेर काढून वाळवून

मलपृष्ठ २ वर

मुखपृष्ठ १ वरून....

त्याचा चुरा करून तो 'ताजा चहा' हॉटेलातून पुरविणारे 'कारखाने' ह्या मुंबईत आहेत....

ही माहिती मिळत असतानाच, विषबाधेच्या नवनव्या बातम्याही कानावर येत आहेत. बाजरीचे साठे गोठवल्यावरही, बाजरीच्या ताज्या विषबाधेवरून विधानसभेत वादळ उठले आहे. बाजरीच्या जोडीला नागपूरला गव्हाची प्रकरणे उद्भवली आहेत. आपण खात आहोत त्यातल्या कुठल्याही घासामुळे केव्हाही, काहीही आपल्याला होऊ शकेल ही धास्ती त्यामुळे मनात आता अधिकच घर करून बसली आहे! पीतो ते पेय, खातो ते पदार्थ खाण्या-पीण्यापूर्वी हा विचार प्रकर्षाने मनात येत आहे!! श्री. बाबा नाईकांनी सुचवलेले सर्वकश भेसळविरोधी आंदोलनही म्हणूनच मनात पुनः पुनः ठाण मांडीत आहे!!

तुम्ही खाता, पिता त्याने तुम्हाला अपाय होऊ नये असे वाटत असेल तर असे आंदोलन आज आवश्यक आहे! भेसळविरोधी प्रशिक्षणाची, संरक्षण-विषयक शिक्षणाइतकीच आज प्रखर आवश्यकता आहे. आणि हे काम राज-कारणात मश्गूल असलेल्या राजकीय पक्षांना शक्य नाही. सामाजिक संस्था, महिला संस्था ह्यांनी ह्याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. धान्य भाववाढ विरोध जेवढ्या प्रखरतेने ह्या संघटनांकडून होत आहे तेवढ्याच प्रखरतेने भेसळ विरोधी आवाजही उठला पाहिजे! भेसळ कर-णारे अड्डे ह्यांनी उखडून काढले पाहि-जेत. त्यांच्याविरुद्ध बहिष्काराचे शस्त्र उपसून शासनाला ह्या प्रकारांची गंभीर दखल घ्यायला भाग पाडले पाहिजे! एरवी भेसळीचा हा राष्ट्रविघातक उद्योग असाच, सर्वांना पोखरीत, पोख-रीत वाढत राहील!!

• • •

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर